



# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १५२ वा ❑ भारतीय सौर दिनांक ०७ श्रावण शके १९४८, बुधवार दि.२९ जुलै २०२६ ❑ पाने ६ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


**विशेष लेख...**

## गुरू देवो भव: कृतज्ञतेचा महाउत्सव

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

गुरु देवो भव: कृतज्ञतेचा महाउत्सव हा आपल्या भारतीय संस्कृतीतील गुरुपौर्णिमा या पवित्र पर्वाचा दुसरा अर्थ आहे. हा दिवस अज्ञानाचा अंधकार दूर करून जीवनाला योग्य दिशा देणाऱ्या गुरूप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा सर्वोच्च सोहळा आहे.भारतीय संस्कृतीत गुरूचे स्थान देवापेक्षाही उच्च मानले गेले आहे, कारण देव कोण आहे आणि त्याच्यापर्यंत जाण्याचा मार्ग कोणता, हे आपल्याला फक्त गुरूच दाखवू शकतात. आषाढ शुद्ध पौर्णिमेला आपण गुरुपौर्णिमा किंवा व्यास पौर्णिमा म्हणून साजरी करतो. या दिवशी आपल्या आयुष्याला आकार देणाऱ्या प्रत्येक गुरूबद्दल कृतज्ञता व्यक्त केली जाते.

गुरू आपल्या मनातील अज्ञानाचा अंधार दूर करून ज्ञानाचा प्रकाश पसरवतात.ते केवळ पुस्तकी ज्ञान देत नाहीत, पुस्तकी ज्ञानासह व्यावहारिक  जीवनात कसे वागावे याचे उत्तम संस्कार घडण्याचे  कार्य गुरुकरतात.गुरूचरणी लीन झाल्यामुळे माणसाचा अहंकार गळून पडतो.आध्यात्मिक प्रगती होते. मानवी मनातील षडरिपूंवर (काम, क्रोध, लोभ इत्यादी) मात करण्यासाठी गुरुतत्व हे एकमेव बलस्थान आहे.

हा दिवस केवळ एका दिवसाच्या पूजेपुरता मर्यादित नसून, गुरूंच्या शिकवणीचे आयुष्यभर पालन करण्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे. हिंदू धर्मासोबतच बौद्ध परंपरेतही याचे मोठे महत्त्व आहे, कारण याच दिवशी भगवान बुद्धांनी सारनाथ येथे आपले पहिले प्रवचन दिले होते. आपण आपल्या जीवनात काय मिळवले आणि कोणते नैतिक विचार अंगीकारले, याचे आत्मपरीक्षण करण्याची ही शुभ तिथी आहे.

हिंदू पुराणानुसार, याच पवित्र दिवशी महाभारताचे रचनाकार महर्षी वेदव्यास यांचा जन्म झाला होता. त्यांनी वेदांचे चार भाग केले, १८ पुराणे आणि अनेक शास्त्रांची निर्मिती करून मानवी संस्कृती समृद्ध केली. ते संपूर्ण जगाचे आदिगुरू मानले जातात, म्हणूनच या दिवसाला व्यास पौर्णिमा असे नाव पडले.

आजचे युग विज्ञान तंत्रज्ञानाचे व डिजिटल युगाचे असून देखील गुरूचे महत्त्व कमी झाले नाही.डिजिटल युगात इंटरनेट आणि कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे  माहितीचा महापूर आला असला, तरी त्या माहितीचे विवेकज्ञानात रूपांतर, नैतिक मूल्यनिर्मिती आणि व्यक्तिमत्त्वाचा योग्य विकास करण्यासाठी प्रत्यक्ष गुरूचे मार्गदर्शन व महत्त्व आजही अनन्यसाधारण व अपरिवर्तनीय आहे.

गुगल किंवा इंटरनेट आपल्याला हवी ती माहिती () क्षणात देऊ शकते, पण ती माहिती खरी की खोटी आणि तिचा वापर कसा करावा हे ठरवणारा विवेक गुरुच देतो. डिजिटल माध्यमांवर उपलब्ध असलेल्या अफाट सामग्रीमुळे संभ्रम वाढू शकतो, ज्यामध्ये योग्य दिशा दाखवण्याचे काम एक सुजाण गुरूच करू शकतो.

ऑनलाइन वर्गांमधून तांत्रिक शिक्षण मिळू शकते, परंतु शिक्षकाचे विद्यार्थ्याशी असणारे भावनिक नाते, प्रेरणा आणि नैतिक संस्कार स्क्रीनवरून मिळणे शक्य नाही.चरित्र निर्माण: केवळ पुस्तकी ज्ञान देणे म्हणजे शिक्षण नव्हे; तर संकटात धैर्याने उभे राहणे आणि जीवनमूल्ये शिकवणे हे केवळ गुरूप्रेमातूनच साध्य होते.आजच्या काळात तंत्रज्ञान हे शिकण्याचे एक साधन बनले आहे, तर गुरू हे मार्गदर्शक किंवा सूत्रधार  आहेत. काळ कितीही बदलला आणि शिक्षण कितीही डिजिटल झाले, तरी विद्यार्थ्याला योग्य आकार देणारा आणि यशाची खरी वाट दाखवणारा दीपमाळरूपी गुरु आयुष्यात नेहमीच मार्गदर्शक राहतो.

तंत्रज्ञान हे केवळ एक साधन आहे, पण त्या साधनाचा योग्य वापर कसा करावा हे शिकवणारे इंजिनियर म्हणजेच आपले गुरू आहेत. त्यामुळे डिजिटल युगात गुरूचे स्थान अधिकच महत्त्वाचे आणि जबाबदारीचे झाले आहे.

# “पेपर फोडू नका, मुलांचे भविष्य वाचवा!”

**बेंदूर सणाचे औचित्य साधून ७ वी तील विद्यार्थिनीची अनोखी जनजागृती बैलाच्या पाठीवर लिहिले संदेश**






**ज्योतिर्मय साहित्य**

शेतकऱ्यांचा सर्वात मोठा आणि जिव्हाळ्याचा सण असणाऱ्या बेंदूर सणाचे औचित्य साधून एका शाळकरी विद्यार्थिनीने सामाजिक आणि शैक्षणिक व्यवस्थेवर भाष्य करणारा एक अत्यंत महत्त्वपूर्ण संदेश दिला आहे.

इयत्ता सातवीमध्ये शिकणाऱ्या आरोही किरण पवार, तनुश्री पवार इयत्ता सहावी, प्रथमेश पवार इयत्ता दुसरी या भावंडांनी राहणार चिंधवली तालुका वाई, यांनी बेंदूर सणाच्या दिवशी आपल्या सजवलेल्या बैलाच्या पाठीवर आणि पोटावर देशातील सध्याच्या सर्वात मोठ्या चालू घडामोडींवर  म्हणजेच नीट पेपर घोटाळा आणि पेपर फ टीच्या प्रकरणावर  थेट भाष्य करणारे संदेश लिहून लक्ष वेधून घेतले.

आरोहीने बैलाच्या अंगावर *“आवाज दाबू नका, प्रश्न सोडवून द्या“, “पेपर फोडू नका मुलांचे भविष्य वाचवा“ अशा आशयाचे गंभीर आणि विचार करायला लावणारे शब्द रेखाटले.

बेंदूर सणाच्या दिवशी जिथे बैलांची पूजा करून त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली जाते, तिथेच देशातील करोडो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी होणाऱ्या खेळखंडोबाबद्दल आरोहीने व्यक्त केलेला हा संताप सध्या सर्वांचेच लक्ष वेधून घेत आहे.

“शेतकऱ्याचा बैल जसा वर्षभर कष्ट करतो, तसेच विद्यार्थी रात्रंदिवस अभ्यास करून आपले भविष्य घडवण्याचा प्रयत्न करतात. मात्र, पेपर फुटीसारख्या प्रकारांमुळे प्रामाणिक विद्यार्थ्यांचे आयुष्य अंधारात ढकलले जात आहे,“ असा संदेश या अनोख्या उपक्रमातून समोर आला आहे.

सातवीतील एका लहान मुलीने अत्यंत संवेदनशील मुद्द्यावर अशा प्रकारे मांडलेली ही भूमिका सध्या सर्वत्र चर्चेचा विषय ठरत असून, तिच्या या सजगतेचे व धैर्याचे कौतुक होत आहे.

✍️ दिपक पवार, चिंधवली
मो. 75883 82445

## गुरुवंदन२०२६ : गुरुजनांच्या सन्मानाचा आणि भारतीय ज्ञानपरंपरेच्या जागराचा प्रेरणादायी सोहळा

**ज्योतिर्मय साहित्य**

बीड – विद्यापीठ विकास मंचाच्या वतीने दि. २९ जुलै २०२६ रोजी गुरुवंदन२०२६ या अभिनव उपक्रमाचे आयोजन बीड येथील केएसके महाविद्यालयात करण्यात आले आहे. शिक्षण क्षेत्रात निस्वार्थपणे कार्य करणाऱ्या गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करणे, भारतीय ज्ञानपरंपरेचे महत्त्व अधोरेखित करणे आणि समाजात शिक्षणाविषयी मूल्याधिष्ठित दृष्टिकोन निर्माण करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. या कार्यक्रमास मा. डॉ. संजय स्वामी (राष्ट्रीय उपाध्यक्ष, शिक्षा संस्कृती उत्थान न्यास), मा. कुलगुरू डॉ. विजय फुलारी, मा. श्री. देवदत्त जोशी (राष्ट्रीय सह संघटनमंत्री), डॉ. प्रशांत साठे (राष्ट्रीय कार्यकारिणी विशेष निमंत्रित सदस्य, अभाविप) तसेच मा. श्री. राम भोगले (ज्येष्ठ उद्योजक, छत्रपती संभाजीनगर) , मा. डॉ. परमेश्वर हसबे ( सचिव , विद्यापीठ विकास मंच, महाराष्ट्र राज्य ) , मा. डॉ. गजानन सानप ( व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. बा. आं. म. वि. छ. संभाजीनगर ) यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

कार्यक्रमात शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात येणार आहे. मा. प्राचार्य चंद्रशेखर राव, मा. प्राचार्य मोहेकर , मा. प्राचार्य वसंत सानप, मा . प्राचार्य दीपाताई क्षिरसगर , मा. डॉ. मुनीश शर्मा , मा. विनायकराव पाटील, या मान्यवरांचा सन्मान होणार आहे .

या उपक्रमाचे एक महत्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे भारतीय ज्ञान प्रणाली या विषयावरील विशेष चर्चासत्रातून भारतीय ज्ञानपरंपरेचे शैक्षणिक, सांस्कृतिक आणि राष्ट्रीय महत्त्व उलगडले जाणार आहे. याशिवाय लोकसंस्कृतीचे दर्शन हा सांस्कृतिक कार्यक्रम उपस्थितांना महाराष्ट्राच्या समृद्ध लोकपरंपरेचा आणि सांस्कृतिक वैभवाचा अनुभव देणार आहे.

या अभिनव उपक्रमाची धुरा स्वागताध्यक्ष मा. योगेशभैया क्षिरसागर हे समर्थपणे पेलवत आहेत. ज्ञान, संस्कार, संस्कृती आणि कृतज्ञतेचा संगम असलेल्या या प्रेरणादायी सोहळ्यास शिक्षणप्रेमी, प्राध्यपक, विद्यार्थी, संशोधक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन स्वागताध्यक मा. योगेश भैया क्षिरसागर, विद्यापीठ विकास मंचाच्या वतीने आयोजक डॉ. सचिन कंदले, प्राचार्य शिवानंद क्षिरसागर, निमंत्रक डॉ. सर्जेराव जिगे, डॉ अश्विन रांजनीकर यांनी केले आहे.

## गुरुविण नाही दुजा आधार...!

**ज्योतिर्मय साहित्य**

गुरुर्ब्रम्हा गुरूर्विष्णु गुरूर्देवो महेश्वरा,

गुरु साक्षात परब्रम्ह तस्मै श्री गुरुवे नम:

गुरुपौर्णिमा.. आपल्या गुरूंचे महत्व जाणून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा सुवर्णक्षण. आषाढ महिन्यातील पौर्णिमेला गुरुपौर्णिमेला किंवा व्यासपौर्णिमा असे म्हणतात. चार वेद, महाभारत व पुराण यांची रचना करणारे महर्षी व्यास यांचा हा जन्मदिवस. अज्ञानाचा अंधःकार दूर करून ज्ञानाचा प्रकाश देणारी व्यक्ती म्हणजे गुरू. संकटाच्या वेळी आपल्या शिष्याच्या पाठीशी ठाम उभे राहून मार्गदर्शन करणारी कोमल हृदयी व्यक्ती म्हणजे गुरू. शिष्य काही चुकीचे वागल्यास सन्मार्गावर आणण्यासाठी प्रसंगी शिक्षा देणारी कठोर व्यक्ती म्हणजे गुरू. श्री दत्तात्रयांनी पशू, पक्षी, मानव व निसर्ग यांच्या कडून काहीना



काही चांगले घेऊन त्यांना गुरू मानले. असे त्यांचे चोवीस गुरू सर्वश्रुत आहेत. मानवी जीवनात कोणत्याही क्षेत्रात गुरूचे अनन्यसाधारण महत्व आहे. गुरुविण नाही दुजा आधार, रडता पडता कोठे अडता, तोच नेतसे पार ! असे एक गीत आहे. जन्मतः बाळाची आई प्रथम गुरू असते. तीच त्याचे पालनपोषण करते.त्याला योग्य संस्कार देते. वडील सुद्धा मुलाला शिस्त लावण्याचा प्रयत्न करतात. प्रथम गुरू आई वडील तर शिक्षक मुलाचे दुसरे पालक असतात. शाळेत असता शिक्षक पालकाची भूमिका पार पाडतात. म्हणूनच म्हणतात “मातृ देवो भव, पितृ देवो भव, आचार्य देवो भव“ यांनाच संस्कृतीची मानचिन्ह मानली आहेत.


अरविंद कुळकर्णी
(सेवानिवृत्त गणित शिक्षक)
भ्रमण. - ९८२२६४२२९४



पूर्वीच्या काळी गुरु व शिष्य आश्रमात एकत्र राहायचे त्यांचे संबंध पिता पुत्र असे होते त्यामुळे शिस्तीचा प्रश्न येत नव्हता गुरु हे पालकच होते.“तमसो मा ज्योतिर्गमय“ या संस्कृत श्लोकाचा अर्थ आम्हांला अंधारातून प्रकाशाकडे ने असा होतो. गुरूमुळे आपला जीवन प्रवास अज्ञानातून ज्ञानाकडे होतो. अलिकडच्या काळात गुरू शिष्य संबंध कमी झाले आहेत. त्याचे काही दुष्परिणाम समाजात दिसत आहेत. विद्यार्थी स्वयंकेंद्रित होत आहेत. आध्यात्मिक क्षेत्रात, कला संगीत क्षेत्रात गुरुपौर्णिमेला आपल्या सद्गुरुंचे विधिवत पूजन करून त्यांना गुरुदक्षिणा समर्पण करण्याची खूप जुनी परंपरा आहे.

“तुझे तेज अंगी शतांशे जरीही,
उजाळून देऊ दिशा दाही दाही“.

असाच भाव आपल्या गुरूप्रती ह्या दिनाच्या निमित्ताने व्यक्त करून आपल्या गुरूंचे स्मरण करूया!



# जात्यावरच्या ओव्या......

पांडुरंग पंढरीचा
कळसावर दिसला
हात जोडले दुरून
गोड गालात हसला ||७६५||

पांडुरंग पंढरीचा
काय सांगतो लोकाला
पुंडलिकाच्या सारखा
सांभाळ मायबापाला ||७६६||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ५७

ज्योतिर्मय साहित्य

जगीं होइजे धन्य या रामनामे ।
क्रिया भक्ति ऊपासना नित्य नेमे ।।
उदासीनता तत्त्वता सार आहे ।
सदा सर्वदा मोकळी वृत्ति राहे ।।५७।।


अर्थ : भक्ताने सतत रामनाम घेऊन या जगात धन्य व्हावे. नुसते नामस्मरण करण्यापेक्षा क्रिया म्हणजे कृतीने, भक्तीने सातत्याने उपासना करावी. मनामध्ये कोणत्याही प्रकारच्या शंका न येऊ देता, उदासीनपणे (म्हणजे आजूबाजूच्या घटनांचा मनावर परिणाम न होऊ देता ) मोकळ्या मनाने रामनामाची उपासना करावी आणि या जगात भक्त म्हणून धन्य व्हावे.

( तत्त्वता - खरोखरच )



विवेचन : या आधीच्या दहा श्लोकांमध्ये समर्थांनी आदर्श भक्त कसा असावा, त्याची लक्षणे सांगितली आणि त्यावरून साधकांना देखील आपण कसे असावे याचा बोध होतो. पण त्या मार्गाने जायचे कसे किंवा त्यासाठी काय करायचे याचा उपाय ते या श्लोकात आपल्याला सांगत आहेत.

आधीचे श्लोक वाचून जर आपल्याला समर्थ म्हणतात त्याप्रमाणे सर्वोत्तम भक्त व्हावेसे वाटले तर समर्थांचा उद्देश सफल झाला असे म्हणता येईल. परंतु असे भक्त




होण्यासाठी संस्कारांची आणि प्रयत्नांची गरज असते. लहानपणापासूनच संस्काराचे महत्त्व असते. ओल्या मातीला आकार देणे सोपे असते. म्हणून मुलांना चांगल्या गोष्टी सांगणे आणि प्रत्यक्ष आपल्या वागणुकीतून त्यांच्यासमोर चांगल्या वागण्याचा आदर्श ठेवणे या गोष्टी संस्कारात येतात.

त्याचप्रमाणे समर्थांनी सांगितलेला भक्त होण्यासाठी देखील संस्काराची मनाला गरज असते. आपले मन सतत विषयाकडे ओढ घेत असते. त्यामुळे मनाला जाणीवपूर्वक भगवंताचे स्मरण, त्याची उपासना करण्याची सवय लावून घ्यावी लागते. हे एक प्रकारचे संस्कारच असतात. गोंदवलेकर महाराज म्हणतात सामान्य माणसाला देवात सुद्धा विषय दिसतात. परंतु संतांना विषयात सुद्धा देव दिसतो.

(क्रमशः)






# ॥ संजय उवाच... ॥


@संजय काव्या पुणे 7743918559

✍️ ऊर्जा

ऊर्जा म्हणजे शक्ती हिचे वेगवेगळे स्रोत आहेत, सूर्यापासून ऊर्जा मिळते, चांगले विचार सुद्धा ऊर्जा देतात तर चांगली संगत सुद्धा, मार्गदर्शनातून ऊर्जा मिळते, चांगल्या कामातून ऊर्जा मिळते, प्रामाणिक मेहनतीतून ऊर्जा मिळते. तिचा चांगला वापर करता आला पाहिजे.

(हे माझे मत आहे पटले तर घ्यावे)

# सत्पुरुष व त्यांचा अनुग्रह



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

सत्पुरुषाचा अनुग्रह झाला म्हणजे त्या व्यक्तीच्या प्रापंचिक आणि पारमार्थिक बाबतीत त्या सत्पुरुषाचीच सत्ता असते. सरकारच्या हातात सर्व सत्ता असते, आणि राज्ययंत्र सुरळीत चालण्याकरिता एकेका खात्याकडे एकेक कामगिरी सोपविलेली असते. कायद्याला धरून जोपर्यंत ते खाते आपले काम करीत असते, तोपर्यंत सरकार त्यात ढवळाढवळ करीत नाही. फक्त क्वचित् प्रसंगी आणि विशेष कारणामुळेच, हस्तक्षेप करून सरकार आपल्या सत्तेचा उपयोग करते, आणि इच्छेप्रमाणे गोष्टी घडवून आणते. तोच नियम इथेही लागू आहे. प्रापंचिक बाबतीत प्रारब्ध हे एक खाते आहे, त्याचा संबंध देहापुरताच असतो. प्रत्येकाच्या प्रारब्धानुसार त्याला बऱ्यावाईट गोष्टी भोगाव्या लागतात. सत्पुरुष होता होईल त्यांत ढवळाढवळ करीत नाही. फक्त व्यक्तीच्या कल्याणाकरिताच जर जरूर असेल, तर सत्पुरुष त्यात ढवळाढवळ करील. पण परमार्थाच्या बाबतीत त्याची सर्व सत्ता असते. आपण मात्र त्याने सांगितलेल्या साधनात राहून, त्याला त्याची कामगिरी करण्यात अडथळा न येईल असे वागणे जरूर असते. हा अडथळा अनेक प्रकारचा असतो. एक म्हणजे, त्याने सांगितलेल्या साधनाबद्दल शंका घेणे; दुसरे, दुसऱ्याला अमुक एक दिवसात साधले, मला अजून का साधत नाही, असा विचार मनात येणे; आणि तिसरे, सांगितलेल्या साधनापेक्षा काही अधिक किंवा कमी करण्याचा प्रयत्न करणे. थोडक्यात म्हणजे, एकदा संताच्या पायावर डोके ठेवल्यावर, आपला प्रपंच आणि परमार्थ ही दोन्ही त्याच्याकडे सोपवून, प्रपंचात घडणाऱ्या गोष्टी त्याच्याच इच्छेने घडताहेत अशी भावना ठेवून, आपले कर्तव्य करीत, त्याने सांगितलेल्या साधनात एकनिष्ठेने राहणे, हाच खरा मार्ग आहे.

संताच्या देहाकडे पाहण्याचे कारण नाही; त्याचा देह आमचे काम करीतच नाही. तो परमात्मस्वरूप आहे ही जी आपली भावना, ती आपले काम करते. संत अत्यंत दयाळू असतात. सत्पुरुषाला भगवंत भेटलेला असतो. म्हणून, सत्पुरुष हा देहाने या जगात राहतो असे दिसले, तरी अंतर्यामी तो भगवंतापाशीच असतो. म्हणून आपण सत्पुरुषाकडे जात असताना या जगातल्या वस्तूविषयी वासना धरून गेलो, तर ते योग्य नव्हे. सत्पुरुषाला त्याच्या लक्षणांवरून ओळखता येणार नाही. पुस्तकामध्ये दिलेली जी लक्षणे असतात, त्यांच्या पलीकडे संत असतो. त्याला ओळखायला आपल्या अंगी थोडे तरी भगवंताचे प्रेम आवश्यक आहे. भगवंताचे प्रेम हे एक मोठे वेड आहे. जे ज्याला लागेल तो भाग्याचा खरा !

भगवंताच्या दास्यात जे प्रेम आहे ते जगाच्या मालकीत नाही.

***

# ॥ अध्यात्म ॥

मधुकर बोरीकर, पुणे

## वारीतील आनंद

संत एकनाथ

साधन ते सार पंढरीची वारी आन न तू करी सायासाचे /
जाऊनिया विठ्ठल पहावा डोळा/ फिटे कर्म मळा जन्मांतरीचा/ मग नलगे साधन /नाना मंत्र विवेक/ रामनामे सुख रंगीत जावे/एका जनार्दनी भाव /अवघा विठ्ठल ची देव//
उच्च नीच हा भेद विसरून वारकऱ्यांनी दिलेल्या परीपाठा प्रमाणे वागत गेल्या आणि आपल्या हृदयाचा भगवत भक्ती फुलल्यास जन्म जन्मांतरीची पापे नष्ट होतात. हे एकनाथ महाराज सांगतात.

संत ज्ञानेश्वर महाराज

पंढरीचे वाटे अनंत घडती याग/
वैकुंठीचा मार्ग तेणे संगे /
जप तप अनुष्ठान क्रिया कर्म धर्म/
हे जाणताती वर्म संतजन/
भक्ती मार्ग फुकटा आनंदाची पव्हे
लागलीसे सवे पुंडलिका/ दिंडी टाळ
घोळ गरुड टकियाचे भार/
वैष्णवा चे गजर जये नगरी/
ती ही लोकी दुर्लभ अमर नेणती/
होऊन पूढती सेविती/
सनकादिक मुनी ध्यानस्थ पै सदा/
ब्रम्हादिका करा न कळे महिमा/
ज्ञानदेव निवृत्ती पुसतसे कोडे/
पुंडलिके केवढे भाग्य केले//




## "सुखाचे रहस्य काय, कसे ?

माणसाचे वय मग तो स्री असो की पुरुष वाढत जाते तसे सुखदुःखाचे अनुभवही वाढतात, पण सुखाने ऊरलेले आयुष्य आनंदी घालवणं तसा प्रयत्न करणं आपल्या हाती आहे.. दुःख कमी करण्यासाठी काळजी करणं थांबवून राग सोडा. त्रासदायक गोष्टी कमी किंवा बंद करा. आरोग्य कमी करणार्या व नकारात्मक बाबी टाळा. पश्चात्ताप भूतकाळ बदलू शकत नाही व काळजी भविष्याला आकार देऊ शकत नाही, म्हणून आजचा वर्तमानाचा आनंद घेणे खरे सुख आहे! समोरची व्यक्ती गरजा सांगण्यात कचरत असेल तर त्या तुम्ही स्वतःहून पूर्ण करा.. कारण दगड तेव्हाच मूर्ती बनते जेंव्हा त्याने शिल्पकाराचे असंख्य घाव सोसलेले असतात! सकारात्मक लोकांशीच बोला व ऐका. आसक्ती सुटली तर सुख कमी होत नाही. शेजारी नातेवाईक यांच्यासी संपर्क वाढवा, हसा -बोला.. पैसा जगण्यासाठी बनवला गेला आहे. पैशासाठी आयुष्य नाही.. मग बघा.. सुखचं सुख. हेच समाधान हेच रहस्य! येथेच थांबतो. गूडडे गूड़ मार्निंग आणि वाचत राहा सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे. स्वस्थ राहा मस्त राहा.. आपले दैनिक वाचत राहा.



# रक्तशुद्धी आणि त्वचेच्या सर्व समस्यांवर कडुनिंब आहे निसर्गाचे वरदान!

ज्योतिर्मय साहित्य

२. त्वचेचे सर्व आजार आणि इन्फेक्शन गायब...

त्वचेवर येणारे लाल फोड, सततची खाज, खरुज, नायटा किंवा उन्हाळ्यातील घामोळे यावर कडुनिंबाचे पाणी म्हणजे एक जालीम उपाय आहे. हे पाणी त्वचेवरील सर्व हानिकारक बॅक्टेरिया मारून टाकते.

३. रोगप्रतिकारशक्ती (इम्म्युनिटी) वाढते...

कडुनिंब शरीराची आतून ताकद वाढवतो. हवामान बदलल्यामुळे होणारे संसर्गजन्य आजार, सर्दी-खोकला यापासून संरक्षण मिळते.

४. पोटातील जंतू आणि मधुमेहावर नियंत्रण... कडुनिंबाची पाने पोटातील जंतू नष्ट करून पचन सुधारतात, तसेच रक्तातील साखरेची पातळी (ब्लड शुगर ) नियंत्रणात ठेवण्यासाठीही ती खूप उपयुक्त ठरतात.

कसा करावा हा उपाय (वापरण्याची अत्यंत सोपी आणि योग्य पद्धत)...

कडुनिंबाचा पुरेपूर फायदा मिळवण्यासाठी तो खालील दोन पद्धतीने वापरता येतो...

१. कोवळी पाने चावून खाणे (रक्तशुद्धीसाठी)...

सकाळी उठल्यावर उपाशीपोटी कडुनिंबाची ४-५ कोवळी (लालसर किंवा फिकट हिरव्या रंगाची) पाने घ्या. ती मिठाच्या पाण्याने स्वच्छ धुवून घ्या आणि थेट तोंडात टाकून बारीक चावून खा. पानांचा रस हळूहळू गिळा.

२. कडुनिंबाच्या पाण्याने अंघोळ (त्वचेच्या आजारांसाठी) ...

एका मोठ्या पातेल्यात पाणी घ्या आणि त्यात कडुनिंबाची १५-२० पाने टाकून ते चांगले उकळून घ्या. पाण्याचा रंग थोडा हिरवट झाल्यावर गॅस बंद करा. हे उकळलेले औषधी पाणी तुमच्या अंघोळीच्या कोमट पाण्यात मिसळा आणि या पाण्याने अंघोळ करा. साबणाचा वापर टाळल्यास अधिक उत्तम!

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

वॉर्निंग (वॉर्निंग - वापरताना घ्यायची काळजी आणि महत्त्वाची पथ्ये)...

हा पारंपरिक उपाय अतिशय सुरक्षित असला, तरी काही विशिष्ट गोष्टींची काळजी घेणे गरजेचे आहे...

१. अतिसेवन पूर्णपणे टाळा... कडुनिंब प्रकृतीने उष्ण आणि अतिशय कडक असतो. त्यामुळे रोज ४-५ पानांपेक्षा जास्त पाने खाऊ नका. तसेच, सलग १५ दिवस पाने खाल्ल्यानंतर पुढचे १५ दिवस खंड (ब्रेक ) द्यावा आणि नंतर परत सुरू करावे.

२. गरोदर महिलांसाठी इशारा...

गरोदर महिलांनी (प्रेग्नन्ट वूमन) आणि स्तनपान करणाऱ्या मातांनी कडुनिंबाची पाने खाणे शक्यतो टाळावे. याच्या उष्णतेमुळे गर्भाला त्रास होऊ शकतो. (अंघोळीसाठी पाण्याचा वापर मात्र त्या करू शकतात.)

३. शुगर खूपच कमी असल्यास (लो ब्लड शुगर) कडुनिंब रक्तातील साखर वेगाने कमी करतो. त्यामुळे ज्यांची शुगर आधीच लो असते, त्यांनी पानांचे थेट सेवन करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला नक्की घ्यावा.

***

# प्रभातपुष्प

## षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

### माझे गुरु

आई असे खरा
पहिला माझा गुरु
चरणी नमन करते
देते हात हाती
सुख-दुःखात सदा
प्रेमाची नाती जपते

बाबा माझे गुरु
उभे खंबीर पाठीशी
जीवनाचा ते शिल्पकार
कडवे बोल ओठी
अंतरी असे माया
नेहमी शब्दांचा आधार

# एमआयटी छत्रपती संभाजीनगर येथे डॉ. रत्नदीप देशमुख यांचा भव्य सत्कार






**ज्योतिर्मय साहित्य**

इन्स्टिट्यूशन ऑफ इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअर्स (आयईटीई), नवी दिल्लीच्या गव्हर्निंग कौन्सिलवर विक्रमी मताधिक्याने पुनर्निवड झाल्याबद्दल आयसीईईएमचे संचालक डॉ. रत्नदीप देशमुख यांचा एमआयटी छत्रपती संभाजीनगर येथे भव्य सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रामौद्योगिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ. वाय. ए. कवडे होते.

एमआयटी समूहाचे माजी विद्यार्थी असलेल्या डॉ. रत्नदीप देशमुख यांनी आपल्या सत्काराबद्दल आणि आतापर्यंतच्या कारकिर्दीतील यशामध्ये मोलाचा वाटा उचललेल्या आपल्या मातृसंस्थेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. त्यांनी १९८९ मध्ये अत्यल्प सदस्यसंख्येपासून सुरू झालेल्या आयईटीई औरंगाबाद लोकल चॅप्टरच्या वाटचालीचा आढावा घेतला. आज या चॅप्टरमध्ये ३६५ हून अधिक सक्रिय सदस्य असून, देशातील अग्रगण्य आयईटीई चॅप्टर्सपैकी एक म्हणून त्याची ओळख निर्माण झाली असल्याचे त्यांनी सांगितले.

तांत्रिक शिक्षण संस्था व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आयईटीई चे योगदान अधोरेखित करताना, औरंगाबाद लोकल चॅप्टरला राष्ट्रीय स्तरावरील अव्वल दहा चॅप्टर्समध्ये स्थान मिळवून देण्याचे आपले स्वप्न त्यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी केवळ सैद्धांतिक ज्ञानावर भर न देता व्यावहारिक कौशल्ये आत्मसात करण्यासाठी अधिक वेळ द्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी अध्यक्षीय भाषणात डॉ. वाय. ए. कवडे यांनी व्यावसायिक संस्थांच्या सदस्यत्वाचे महत्त्व विशद केले. तांत्रिक शिक्षण क्षेत्रातील देशातील २० राष्ट्रीय व्यावसायिक संस्थांचे सदस्यत्व असल्यामुळे राष्ट्रीय स्तरावरील विविध घडामोडी, संशोधन आणि उपक्रमांची अद्ययावत माहिती मिळण्यास मोठी मदत होत असल्याचे त्यांनी सांगितले.

एमआयटी छत्रपती संभाजीनगरचे संचालक डॉ. निलेश पाटील यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना व्यावसायिक संस्थांशी संलग्न राहण्याचे आणि सातत्याने ज्ञान अद्ययावत ठेवण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. शिल्पा नांदेडकर यांनी प्रास्ताविक केले. तसेच एमआयटीच्या आयईटीईविद्यार्थी चॅप्टरतर्फे वर्षभरात आयोजित करण्यात आलेल्या विविध उपक्रमांची दृकश्राव्य चित्रफीत सादर करण्यात आली. या प्रसंगी ग्रामोद्योगिक शिक्षण मंडळाच्या संचालिका डॉ. शकुंतला लोमटे, डॉ. वंदना जाधव-देशमुख, एमआयटी पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. एस. जी. देशमुख, डीन (अकॅडेमिक्स) डॉ. अशोक केचे, निबंधक डॉ. गणेश साबळे, डीन (विद्यार्थी विकास) डॉ. अमित रावते, विभागप्रमुख डॉ. स्मिता कासार व डॉ. कविता भोसले, प्राध्यापक, कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे समन्वयन प्रा. डॉ. प्रीती पाटील यांनी केले त्यांनीच उपस्थितांचे आभारही मानले.

# ऑंथिया सोसायटीत आषाढी एकादशी दिंडी व पालखी सोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न!

**ज्योतिर्मय साहित्य**

पिंपरी : २५ जुलै रोजी ऑंथिया सोसायटीमध्ये आषाढी एकादशीनिमित्त आयोजित केलेला दिंडी आणि पालखी सोहळा अतिशय भक्तिमय, चैतन्यमयी आणि उत्साही वातावरणात पार पडला. सोसायटीतील सर्व पांडुरंग भक्त या सोहळ्यात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

सोहळ्याची प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे विधीवत पूजन, सकाळी भक्तिभावाने पूजा झाल्यानंतर पालखी आणि दिंडी सोहळ्याला सुरुवात झाली. सोसायटी परिक्रमा : टाळ-मृदुंगाचा गजर आणि



''विठ्ठल-विठ्ठल''च्या जयघोषात पालखी आणि दिंडीने संपूर्ण सोसायटीत फेरी मारली, आळंदी वारकरी : आळंदीच्या वारकऱ्यांनी त्यांच्या भजन आणि वारकरी नृत्य व फुगडी ने दिंडीची शोभा द्विगुणीत केली. छोट्या भक्तांची वेशभूषा : आपल्या बालवारकऱ्यांनी विविध पारंपरिक वेशभूषा करून सर्वांची मने जिंकून घेतली. महिलांचे टाळ-नृत्य : महिला ग्रुपने पांडुरंग आणि माऊलींच्या भजनांवर टाळांच्या साथीत सुंदर नृत्य सादर केले. आरती व पसायदान : दिंडीनंतर भावपूर्ण आरती, मंत्रपुष्पांजली आणि पसायदान पार पडले. फराळ वाटप : शेवटी सर्व भक्त-भाविकांना फराळ वाटप करून सोहळ्याची सांगता झाली.

आळंदीचे वारकरी, ज्येष्ठ नागरिक, महिला वर्ग, पुरुष आणि चिमुकल्या भक्तांच्या उत्स्फूर्त उपस्थितीमुळे या सोहळ्याची शोभा अधिकच वाढली. सोहळा यशस्वी करण्यासाठी सहकार्य करणाऱ्या दिंडी समिती, समस्त महिला वर्ग, जेष्ठ नागरिक संघ, श्रीराम ऑंथिया ट्रस्ट आणि इतर सर्व सहभागी सदस्यांचे मनःपूर्वक आभार !



# पिंपळे सौदागर येथे कारगील दिन उत्साहात साजरा

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे - युद्धभूमीवर शत्रुसमोर प्रत्यक्ष लढणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या निर्भिड बाण्याचा आदर्श समाजातील प्रत्येकाने समोर ठेवावा असे आवाहन अप्पर जिल्हाधिकारी सतिश राऊत यांनी केले.

उन्नती सोशल फाउंडेशन, यशसिद्धी, आजी - माजी सैनिक बहुउद्देशीय वेल्फेअर असोसिएशन आणि माजी सैनिक संघटनेच्यावतीने आयोजित कारगील दिनानिमित्त शहीदांच्या श्रद्धांजली कार्यक्रमात ते बोलत होते. पिंपळे सौदागर येथे मंगळवार दि. २८ रोजी सकाळी स्व. बाळासाहेब कुंजीर क्रिडांगणावर परिसरातील नागरिकांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम उत्साहात झाला. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे शहिदांच्या वीर पत्नी मंगला साळुंके, जयश्री धनवडे, पद्मीनी भालेराव, नैना सकट आणि प्रतिमा भाटे यांचा शाल आणि सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी अप्पर जिल्हाधिकारी सतिश राऊत, मेजर जनरल सुधाकर चिन्नावार, कॅप्टन बाबू पोलके, हभप विजूशेठ जगताप, पिंपरी चिंचवड भाजपाचे शहराध्यक्ष शत्रृघ्न बापू काटे, नगरसेविका डॉ. कुंदा भिसे, अनिता काटे, स्नेहा कलाटे, पवना बँकेचे संचालक जयनाथ काटे, पी के इंटरनॅशनल स्कूलचे संचालक जगन्नाथ काटे, उन्नती सोशल फाउंडेशनचे संचालक संजय भिसे, यशसिद्धीचे प्रमुख संतोष वानखेडे आदिंच्या हस्ते कारगील विजय स्तंभाच्या प्रतिकृतीस पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. त्यानंतर हवालदार बुद्धा चव्हाण यांनी कारगील युद्धासंबंधी माहिती दिली.

सदरील कार्यक्रमाच्या आयोजिका नगरससेविका डॉ. कुंदा भिसे यांनी याप्रसंगी प्रतिक्रिया व्यक्त करताना सांगितले की, राष्ट्राच्या सुरक्षेसाठी आपल्या जीवाची आहुती देणाऱ्या जवानांचे देदिप्यमान कार्य नव्या पिढीला माहित व्हावे आणि प्रखर राष्ट्रभक्तीचा आदर्श त्यांच्या डोळ्यासमोर रहावा या उद्देशाने हा उपक्रम हाती घेतला. यावेळी कारगील दिनाच्या पार्श्वभूमीवर पी के इंटरनॅशनल स्कूल, चॅलेंजर पब्लिक स्कूल आणि अण्णासाहेब मगर प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रभक्तीपर नृत्य, नाटिका तसेच प्रसंग सादर करुन उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वसुधा गोडसे यांनी केले. डॉ. धनश्री सोनवणे यांनी सादर केलेल्या वंदेमातरम आणि राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी हवालदार प्रकाश मारके, रामचंद्र यादव, गौतम सोनवणे यांचे विशेष सहकार्य लाभले.

# गुरु पौर्णिमा

**ज्योतिर्मय साहित्य**

आज आपण एक श्रेष्ठ ऋषी, भगवंताचे अवतार, विशाल बुद्धी, चारी वेदांचे जाणकार, कृष्ण द्वैपायन महर्षी वेदव्यास यांचा जीवन परिचय करून घेणार आहोत.


महर्षी वेद व्यास यांची जन्म तिथि आषाढ पौर्णिमा असते, म्हणून याच दिवशी व्यासपौर्णिमा किंवा गुरुपौर्णिमा म्हणून ती साजरी केल्या जाते.

व्यासांच्या प्रचंड बुद्धीला मानवंदना देण्यासाठी व त्या स्वरूपात असणाऱ्या आपल्या गुरु जनासाठी कृतज्ञतेची भावना व्यक्त करणारा हा दिवस असतो. आपल्या जीवनात आलेले दीक्षा गुरु, मोक्ष गुरू यांच्या चरणावर विनम्र होणे यासाठी हे पर्व प्रसिद्ध आहे.

*महर्षी वेद व्यासांचा जीवन परिचय*

प्राचीन काळी सुधन्वा नावाचा एक राजा होता. या राजाला पुत्र संतान नव्हते. एक दिवस तो शिकार करण्यासाठी वनात गेला होता. तो तिकडे वनात गेला की, त्याची पत्नी हिला मासिक पाळी आली. तिने ही बातमी आपल्या शिकारी पक्षा द्वारे पत्र लिहून पतीला कळविली. जेव्हा राजाने ही बातमी वाचली तेव्हा त्याने एका द्रोणा त आपले वीर्य काढून ते पक्षासोबत पाठविले. पक्षी आकाशातून द्रोण घेऊन उडत असताना रस्त्यात त्याला एक दुसरा शिकारी पक्षी आडवा आला. दोघांचे भांडण लागले व तो द्रोण खाली यमूनेत जाऊन पडला.

ब्रह्म देवाच्या शापामुळे मासोळी झालेली एक अप्सरा तिथे यमूनेत होती. तिने ते वीर्य पिऊन टाकले. यामुळे ती गर्भवती झाली. काही दिवसांनी एका कोळ्याने ती मासळी पकडली व तिचे पोट चिरले असता, त्यातून एक छोटा मुलगा व मुलगी निघाली. मासळीच्या पोटात मानवी बालके दिसल्याने ,तो कोळी




आश्चर्यचकित झाला. त्याने या दोन्ही बालकांना घेऊन राजाकडे प्रस्थान केले. महाराज सुधन्वाला अद्याप पुत्र नव्हता, म्हणून त्यांनी यातील मुलाला आपल्याजवळ ठेवून घेतले व बालिकेला त्या कोळ्या सोबत परत पाठविले.

त्या मुलीचे संगोपन त्या कोळ्यानेच केले.

कोळ्याने या मुलीचे नाव मत्स्यगंधा ठेवले. कारण तिच्या देहाला मासोळी सारखा वास येत असे. मत्स्य गंध्येला सत्यवती या नावाने देखील ओळखल्या जात असे. सत्यवती मोठी झाल्यावर नाव वल्हविण्याचे काम करीत असे.

एकदा पाराशर ऋषी यमुना तीरावर भ्रमण करीत असताना, त्यांची नजर सुंदर तरुण सत्यवती वर पडली. तिची सुंदरताच अशी होती की, कोणीही तिच्याकडे आकर्षित होई. पाराशर ऋषींचे ही असेच झाले. त्यावेळेस सत्यवती नावेत बसली होती. ऋषींनी सत्यवती ला नावेतून नदीपार करविण्या ची विनंती केली. तिनेही त्यांचे नावेत स्वागत केले.

पाराशर ऋषी तिच्या सौंदर्याने इतके मोहित झाले होते की, त्यांनी लगेच तिच्याजवळ सहवासाची अपेक्षा व्यक्त केली. त्यावर सत्यवती म्हणाली की, मूनीवर आपण ब्रह्मज्ञानी आहात व मी एका कोळ्याची कन्या आहे. आपला सहवास संभवत नाही.




यानंतर पुन्हा ऋषींनी इच्छा व्यक्त केली, तेव्हा सत्य वतीने तीन अटीवर सहवास देण्याचे कबूल केले.

१) सत्यवती ची पहिली अट ही होती की, एकांतात ती दोघे असताना दुसऱ्या कोणीही त्यांना पाहू नये. ऋषिनी योग बलाने तिथे नदीत एक द्वीप निर्माण केले. त्या द्वीपा वर दाट धुके होते. त्यामुळे कोणासही तिथे काही दिसू शकत नव्हते.

२) तिने दुसरी अट ही ठेवली की, तिच्या अंगाला सतत मासळीचा वास येतो. तो जाऊन त्या ऐवजी फ ुलांचा सुगंध येत रहावा.पाराशर ऋषींनी आपल्या योग शक्तीने तसेच केले.

३) सत्यवती ने तिसरी अट घातली की, सहवासा नंतर जेव्हा गर्भधारणा होईल, तेव्हा तो बालक कोणी सामान्य न राहता, तो महाज्ञानी व्हावा. तो कोळी राहू नये. ऋषींनी असेच वरदान दिले व तिला आणखी सांगितले की, सहवासा नंतर ही तिचे कौमार्य अबाधित राहील. तिच्या तीनही अटी पूर्ण झाल्यानंतर सत्यवती व पाराशर ऋषी त्या दिव्य बेटावर राहू लागले. त्यांच्या सहवासातून सत्यवती ला गर्भ राहिला आणि तिने एका दिव्य पुत्राला जन्म दिला. हा वेद पारंगत महाज्ञानी मुलगा वर्णाने काळा होता व तो यमुनेच्या एका बेटावर जन्माला म्हणून त्याला कृष्ण द्वैपायन असे नाव ठेवण्यात आले. पुढे त्यांना महर्षी वेदव्यास, बादरायण असेही नावे प्राप्त झाली.

क्रमशः

## कृतज्ञ मी कृतार्थ मी भगवंत हृदयस्थ आहे

© अपर्णा परांजपे कात्रज पुणे मो.95030 45495



### सनातन

पुढे.....

शंकराचार्यांच्या मते परमब्रह्म हेच खरे सनातन तत्त्व आहे. ते न जन्मते, न नाश पावते, न त्यात कोणताही विकार होतो. जीवाचे खरे स्वरूपही आत्मरूप असून ते ब्रह्माशी अभिन्न असल्याने तेही सनातन आहे. शरीर, मन, बुद्धी, इंद्रिये, समाजव्यवस्था, रूढी आणि व्यवहार हे सर्व परिवर्तनशील असल्यामुळे ते सनातन नाहीत.

भगवद्गीतेच्या भाष्यात शंकराचार्य "स्वधर्म" आणि "सनातन धर्म" यांचा अर्थ वेदांनी सांगितलेला धर्म असा करतात. हा धर्म मनुष्याला चित्तशुद्धी देतो आणि अखेरीस ब्रह्मज्ञानाची पात्रता निर्माण करतो. म्हणून धर्माचे अंतिम प्रयोजन मोक्षप्राप्ती आहे.

शंकराचार्यांच्या दृष्टीने धर्माचे दोन स्तर आहेत. एक म्हणजे व्यवहारातील वर्णाश्रमधर्म, यज्ञ, दान, तप, उपासना इत्यादी, जे साधनरूप आहेत; आणि दुसरा म्हणजे ब्रह्मज्ञान, जे मोक्षाचे प्रत्यक्ष कारण आहे. म्हणून कर्म हे साधन असले तरी ज्ञान हे अंतिम साध्य आहे.

म्हणून शंकराचार्यांच्या मतानुसार 'सनातन धर्म' म्हणजे केवळ सामाजिक रूढी किंवा परंपरा नव्हे, तर वेदप्रणीत असा जीवनमार्ग, जो अखेरीस आत्मसाक्षात्कार आणि ब्रह्मप्राप्तीकडे नेतो. नित्य सत्य असलेले ब्रह्म, त्याच्याशी अभिन्न असलेला आत्मा आणि त्या सत्याची अनुभूती करून देणारे

♦ वेद – हाच सनातन धर्माचा मूलाधार आहे.

शास्त्राधार :

"न जायते म्रियते वा कदाचित्..." (भगवद्गीता २.२०) – आत्म्याचे सनातन स्वरूप.

"नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः" (भगवद्गीता २.१६) – सत्य कधी नष्ट होत नाही.

"ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः" – शंकराचार्यप्रणीत अद्वैत वेदान्ताचा सार.

"सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म" (तैत्तिरीय उपनिषद् २.१) ▪ ब्रह्माचे सनातन स्वरूप.

शंकराचार्यांच्या अद्वैत वेदान्तात "सनातन" म्हणजे नित्य, अव्यय, अविकार, त्रिकालाबाधित आणि स्वयंसिद्ध सत्य. हे सत्य म्हणजे ब्रह्म. जे काळ, देश, परिस्थिती किंवा परिवर्तन यांच्या अधीन नाही, तेच सनातन.

१. आत्मा सनातन आहे (भगवद्गीता २.२०)

न जायते म्रियते वा कदाचिन्नायं भूत्वा भविता वा न भूयः ।अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणोन हन्यते हन्यमाने शरीरे ॥

शंकराचार्य म्हणतात–

"नित्यः सर्वदा भवति, शाश्वतः अविकारस्वभावः, पुराणः अपि नित्यनवत्वात्."

अर्थ : आत्मा कधी जन्म घेत नाही, मरत नाही. तो नित्य, शाश्वत आणि अविकार आहे. "पुराण" असूनही तो कधी जीर्ण होत नाही; म्हणून तो सनातन आहे.

## विचार ते विजय

लेखक - अमोल बोरीकर.मो. 86240 03013



### तुलना की प्रगती – खरा मार्ग कोणता?

आजचा माणूस स्वतःपेक्षा दुसऱ्यांकडे जास्त पाहतो. कोणाची मोठी गाडी, कोणाचं आलिशान घर, कोणाची मोठी नोकरी, कोणाचे परदेश दौरे, तर कोणाचे सोशल मीडियावरील हसरे फोटो... आणि मग नकळत मनात एक प्रश्न जन्म घेतो –"मीच मागे पडलो का?"

याच एका विचारातून न्यूनगंड, असंतोष आणि दुःखाची सुरुवात होते.आजच्या या हाय-टेक जगात आपण ज्या सगळ्यात मोठ्या आजाराने ग्रस्त आहोत, तो म्हणजे– 'तुलनेचा आजार'. आपण जन्माला आल्यापासूनच या तुलनेच्या चौकटीत अडकलो आहोत. लहानपणी शेजाऱ्याच्या मुलाच्या मार्कांशी आपली तुलना झाली, मग नोकरीच्या पॅकेजची तुलना झाली आणि आता राहणीमानाची! पण ही तुलना आपल्याला कुठे घेऊन चालली आहे? दुसऱ्याशी तुलना करताना आपण सतत एक प्रकारच्या नकारात्मकतेत आणि अपुरेपणात जगत असतो. जेव्हा आपण स्वतःला दुसऱ्याच्या तराजूत तोलतो, तेव्हा आपण नकळत स्वतःच्याच क्षमतेचा अपमान करत असतो. निसर्गाने गुलाबाला जे सौंदर्य दिले आहे, तेच कमळालाही दिले आहे; पण गुलाब कधी कमळासारखे फुलण्याचा प्रयत्न करत नाही. मग आपणच का दुसऱ्याचे 'परफेक्ट आयुष्य' पाहून स्वतःचे आयुष्य कोसत बसतो? हा तुलनात्मक विचार आपल्याला विजयाकडे नाही, तर विनाशाकडे घेऊन जातो.

मग यातून बाहेर पडण्याचा आणि खऱ्या यशाचा मार्ग कोणता? तो मार्ग आहे– 'प्रगती' (Self-Growth).तुलना आत्मविश्वास कमी करते, तर प्रगती आत्मविश्वास वाढवते.

तुलनेच्या या विषारी चक्रातून बाहेर पडण्यासाठी आपल्याला एक लहानशी पण क्रांतिकारी 'कृती' करावी लागेल. आजपासून दुसऱ्याच्या आयुष्याची 'रिल' (Reel) पाहणे बंद करून, स्वतःच्या आयुष्याची 'रिअल' (Real) बाजू पाहायला शिका.

प्रगती म्हणजे इतरांना मागे टाकणं नव्हे; तर कालच्या स्वतःपेक्षा आज अधिक सक्षम होणं. दररोजची एक चांगली सवय, एक नवीन कौशल्य, एक सकारात्मक विचार आणि एक छोटं चांगलं काम–यातूनच मोठा बदल घडतो.

लक्षात ठेवा, प्रत्येकाचा प्रवास वेगळा असतो. कोणाला यश लवकर मिळतं, कोणाला उशिरा; पण उशिरा फुलणारं फूल कमी सुंदर नसतं. आंब्याचं झाड आणि वडाचं झाड एकाच वेगाने वाढत नाहीत, तरी दोघांचं महत्त्व वेगळं आणि तितकंच मोठं असतं. दुसऱ्याची रेघ पुसून स्वतःची रेघ मोठी करण्यापेक्षा, स्वतःची रेघ स्वतःच रोज थोडी मोठी करत जाणे, हाच 'विचार ते विजय' या प्रवासाचा खरा आणि एकमेव राजमार्ग आहे,कारण खरा विजय पहिला क्रमांक मिळवण्यात नसतो; स्वतःची सर्वोत्तम आवृत्ती घडवण्यात असतो.

आजचा विजयमंत्र

"तुलना तुम्हाला दुसऱ्यासारखं बनवते; पण प्रगती तुम्हाला तुमच्यासारखं सर्वोत्तम बनवते. म्हणून तुलना सोडा, स्वतःला घडवा आणि प्रत्येक दिवस कालपेक्षा अधिक सुंदर जगा."



## महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

### 'आजोबा' (सुरकुत्यांमधील शहाणपण)

कधी कधी मनात अशी शंका येते की, आपण भौतिक सोयी-सुविधा मिळवून खरंच प्रगती करत आहोत का? कारण आज एकविसाव्या शतकाच्या उत्तरार्धात, बदलत्या कौटुंबिक चौकटीमुळे हे चित्र खूपच बदलले आहे. एकत्र कुटुंब पद्धती जाऊन 'विभक्त कुटुंबे' आली आणि शहरीकरणाच्या फ्लॅट संस्कृतीमध्ये आजची लहान मुले आजोबांच्या या अथांग मायेला मुकत चालली आहेत. आजी-आजोबांमुळे भक्कम असणाऱ्या घराच्या भिंती आज केवळ एक पोकळ डोलारा म्हणून उभ्या राहत आहेत की काय, असे मला वाटते. आज 'आजी-आजोबा' म्हटले की अनेकांना थेट 'वृद्धाश्रम' डोळ्यांसमोर येतो. याला समाजाची प्रगती म्हणायचे की अधोगती? हा खरोखरच विचार करण्यासारखा गंभीर प्रश्न आहे.

नात्यांचा हा भक्कम पदर आज काळाच्या ओघात विरत चाललेला आहे. मुले आजोबांच्या वात्सल्याच्या छायेला मुकत आहेत, ही आजच्या काळातील सर्वात मोठी हानी आहे. 'नटसम्राट' चित्रपटात किंवा नाटकात आजी-आजोबांचे आपल्या नातवंडांवर किती अथांग प्रेम असते, ते पाहून डोळे हमखास ओलावतात; परंतु आजकालच्या जगात घरात नातवंडांवर जीव लावणारी अशी ज्येष्ठ माणसे देखील काहींना नकोशी झालेली दिसतात. घराला घरपण आणि नात्यांच्या या महावस्त्राला भक्कम आधार देणारा हा 'आजोबा' नावाचा पदर संपूर्ण घराला आपल्या मायेच्या धाग्यात घट्ट बांधून ठेवतो. हा पदर जेवढ्या सन्मानाने आणि आदराने घरात जपला जाईल, तेवढा आपला समाज आणि आपली पुढची पिढी अधिक सुदृढ व सुसंस्कारी होईल.

# गुरुपौर्णिमा – ज्ञान, संस्कार आणि कृतज्ञता उत्सव

**ज्योतिर्मय साहित्य**

''गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः ।गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ।।''

आजच्या काळात गुगलकडे प्रत्येक प्रश्नाचे उत्तर असते, पण जीवन कसं जगायचं याचं उत्तर मात्र गुरुच देतो! मोबाईल माहिती देतो, पण गुरु विवेक देतो. इंटरनेट मार्ग दाखवते, पण गुरु योग्य दिशा दाखवतो. म्हणूनच गुरुपौर्णिमा हा केवळ एक सण नाही; तो आपल्या आयुष्यात प्रकाश पेरणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला कृतज्ञतेने वंदन करण्याचा दिवस आहे.

भारतीय संस्कृतीत गुरूचे स्थान अत्यंत उंच मानले गेले आहे. आई-वडील आपल्याला जन्म देतात, पण गुरु व्यक्तिमत्त्वाला आकार देतो. म्हणूनच आपल्या संस्कृतीने म्हटले आहे

''आचार्यात् पादमादत्ते, पादं शिष्यः स्वमेधया।पादं सब्रह्मचारिभ्यः, पादं कालक्रमेण च।।''

म्हणजेच, ज्ञानाचा एक भाग गुरूकडून, एक स्वतःच्या अभ्यासातून, एक सहकाऱ्यांकडून आणि उरलेला अनुभवातून मिळतो.

गुरुपौर्णिमा म्हणजे महर्षी वेदव्यास यांची जयंती. त्यांनी वेदांचे संकलन केले, महाभारताची निर्मिती केली आणि भारतीय ज्ञानपरंपरेला अजरामर स्वरूप दिले. म्हणून हा दिवस व्यास पौर्णिमा म्हणूनही ओळखला जातो.

पण गुरु म्हणजे नेमकं कोण? फक्त शाळेत शिकवणारे शिक्षक? अजिबात नाही! चालायला शिकवणारी आई, संकटात खंबीर उभे राहायला शिकवणारे वडील, आयुष्याची दिशा दाखवणारे शिक्षक, संस्कार देणारे आजी-आजोबा, प्रेरणा देणारे संत, चुकांमधून शिकवणारे अनुभव आणि कधी कधी आपली लहानशी नातवंडेसुद्धा... हे सारेच आपल्या आयुष्यातले गुरु असतात.

संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानाची गंगा सामान्य माणसापर्यंत पोहोचवली.




संत तुकारामांनी अभंगातून जीवनाचे तत्त्वज्ञान शिकवले. समर्थ रामदासांनी स्वराज्याची प्रेरणा दिली. छत्रपती शिवाजी महाराजांना घडवण्यात राजमाता जिजाऊ आणि समर्थ रामदास यांचे योगदान अनमोल आहे. स्वामी विवेकानंदांनी सांगितले होते

''उठा, जागे व्हा आणि ध्येय प्राप्त होईपर्यंत थांबू नका.'' हा संदेशही एका महान गुरूकडूनच मिळालेला जीवनमंत्र आहे.

डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम म्हणायचे,

स्वप्न पाहायला अनेकजण शिकवतात; पण ती स्वप्ने पूर्ण करण्याची हिंमत गुरु देतो.

आज कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटरनेट आणि मोबाईलच्या युगात माहितीचा महापूर आहे. पण माहिती आणि ज्ञान यात मोठा फरक आहे. माहिती डोक्यात जाते, तर ज्ञान मनात उतरते. हे काम गुरुच करू शकतो.

संत कबीरांचा प्रसिद्ध दोहा आजही तितकाच अर्थपूर्ण वाटतो

''गुरु गोविंद दोऊ खडे, काके लागूं पाय? बलिहारी गुरु आपल्या, गोविंद दियो बताय.''

आजच्या धावपळीच्या जीवनात आपण अनेकांना ''थँक यू '' म्हणतो; पण ज्यांनी आपल्याला माणूस बनवलं, त्यांना धन्यवाद देण्यासाठी गुरुपौर्णिमेसारखा सुंदर दिवस दुसरा नाही. चला, या गुरुपौर्णिमेला एक संकल्प करूयाज्यांनी आपल्याला काहीतरी चांगलं शिकवलं, त्यांच्याप्रती कृतज्ञ राहूया. स्वतः शिकूया, इतरांनाही शिकवूया आणि ज्ञानाचा दिवा सतत तेवत ठेवूया. गुरु म्हणजे दीप ज्ञानाचा, गुरु म्हणजे विश्वास।गुरु म्हणजे आयुष्याला मिळालेला सुवर्ण श्वास।।

गुरुपौर्णिमेच्या सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा!






## गुरु एके गुरु... आईवडिल हेच पहिले गुरु !

**ज्योतिर्मय साहित्य**

प्रत्येकाचे पहिले गुरु हे आईवडिलच असतात. आईवडिलांपासूनच आपली ओळख, अस्तित्व आणि निर्मळ जगणं सुरु होतं. आणि आईवडिलांमुळेच आपल्याला, आपल्या आयुष्याला खरी ओळख मिळते. जगण्याची सार्थकता आईवडिलांमुळेच सार्थकी ठरते. आपल्याला आयुष्यभराचे संस्कार आईवडिलांमुळेच मिळतात. आयुष्य कसे जगावे याची शिकवण आईवडील आपल्याला नि:स्वार्थ पणे शिकवीत असतात. आईवडील हेच पहिले गुरु असतात. बाळ चालायला शिकत असताना बाळाचे बोट धरून त्याला प्रत्येक पाऊल टाकताना चालायला शिकवितात तसेच आयुष्यभराची शिकवणही येथूनच सुरु होते.

घरात आईवडिलांकडून जे संस्कार केले जातात. ते पहिले संस्कार म्हणजे चांगल्या विचारांची रुजवणूक आणि येथून मूल घडविले जाते. चांगल्या वाईट गोष्टींची माहिती, त्यातील फरक सखोल शिकवीला जातो. आणि चांगल्या वाईट गोष्टींचे अचूक ज्ञान आईवडीलच देत असतात. आईवडील हे असे गुरु आहेत जे की, आपल्याकडून कुठल्याही गोष्टीची कसलीच अपेक्षा करत नाहीत. मुलांवर नि:स्वार्थ प्रेम, लाड करित असतात. आणि हे गुरु आपल्या मुलांसाठी त्यांच्या सुखा:चा त्याग करुन मुलांसाठी जगत असतात. जे कांही आहे ते सारे आईवडिलांच्याच चरणी आहे.




आईवडिलांआधी कुणीच नाही आणि नसतंही. जे कांही आहे ते आईवडिलां नंतर आहे. आई अनंत कळा यातना, वेदना हसत सहन करून बाळाला जन्म देते बाळाला परिपूर्ण बनविते. आणि वडील मुलांना परिपूर्ण घडवीतात. आई प्रत्येक शब्द शिकविते. त्या शब्दाला अर्थ प्राप्त करुन त्यात त्राण आणि प्राण कसे भरावे हे वडील शिकवितात. आई मुलांवर प्रत्येक वैचारिक संस्कार करीत असते. आणि आयुष्यात पुढे जाण्यासाठी त्या विचारांना स्वातंत्र्य कसे द्यावे हे वडील शिकवितात. आई पुजापाठ शिकविते आणि वैचारिक मूल्य, नीतिमत्ता, चांगली निती कशी ठेवावी हे वडील शिकवितात.

आईवडिलांनी ज्या ज्या गोष्टींची शिकवण दिली त्याच शिकवणीवर आज आपण सारेच जगतोय. आईवडिलांवीन दुजा ना कोई गुरु. आपले घर म्हणजे एक मंदिर. आणि त्या मंदिरातील गुरु म्हणजे आपले आईवडील. आईवडील आपल्यावर संस्कार करतात. आपल्याला आपल्या आयुष्यभरासाठी संस्काराची शिदोरी देतात. आपली जडण-घडण ही सर्वप्रथम घरातच होते. कुणाशी कसे बोलायचे, कसे वागायचे ही शिकवण आईवडील देतात. चांगल्या विचारांची, चांगल्या संस्कारांची घडवणूक ही आईवडिलांकडूनच केली जाते.

''अ आ इ ई '' शिकविणारी आई आणि आयुष्य कसे जगावे हे सांगणारे वडील आपले पहिले गुरु असतात. आपण उंबरठ्याबाहेर पाऊल टाकल्यानंतर बाहेरच्या जगात, वातावरणात आपण कसे राहावे ही शिकवण शिवाय आईवडिलांच्या इतर कुठलीही व्यक्ती शिकवू शकत नाही. जीवनाची सार्थकता, जगण्याची मार्मिकता, स्व-कल्याण या सर्व महत्वपूर्ण गोष्टींची समर्पकता आईवडिलांपासून सुरु होऊन त्यांच्याच चरणी समर्पित होते. आईवडील आपले सर्वस्व असतात. आईवडिलांशिवाय आपले अस्तित्व शून्य आहे. आपल्या अस्तित्वाची खरी ओळख आपले आईवडील आहेत. आईवडिलांची अगणिक महती शब्दांमध्ये सांगणे वा मांडणे अशक्य आहे. आईवडिलांच्या अनमोल ऋणांची परतफेड आपण सात काय कुठल्याच जन्मात करू शकत नाही.

''सर्वस्व म्हणजेच आईवडील''

# सद्गुरु सारिखा असता पाठीराखा

**ज्योतिर्मय साहित्य**


गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः
गुरु साक्षात परब्रम्ह तस्मै श्री गुरवे नमः

हा श्लोक आपण रोज म्हणत असतो. गुरू हे प्रत्यक्षात ब्रह्मा, विष्णू, आणि महेश आहेत. आपल्या जीवनात सदगुरुंचे स्थान फार महत्त्वाचे आहे. सर्व मानव जातीला पारमार्थिक, अध्यात्मिक उन्नतीचा मार्ग दाखवणारे, भक्ताला, साधकाला मोक्षाप्रत नेणारे सद्गुरु त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आषाढ शुक्ल पौर्णिमा अर्थातच गुरु पौर्णिमेला आपण सदगुरु पूजन करतो. मोक्ष प्राप्तीची वाट दाखवणारे सद्गुरु लाभणे अतिशय भाग्याचे असते.

आयुष्याचा पथ हा दुर्गम अवघड डोंगर घाट

गुरुविण कोण दाखवील वाट.

हा भवसागर तरुन जायचे असेल तर सदगुरुंची आवश्यकता आहे. सदगुरुच आपल्याला मोक्षाप्रत नेतात. एकदा त्यांनी आपला हात हातात घेतला की ते आपल्याला सोडत नाहीत.सदगुरुंना शोधण्यासाठी आपणास जावे लागते असे नाही, तर शिष्याची अध्यात्मिक तयारी झाली की ते स्वतः होऊन त्याला शोधत येतात. आपल्या पूर्व प्रारब्धानुसार कर्मानुसार आपल्याला सदगुरुंची भेट होत असते. सदगुरुं कडून एकदा का अनुग्रह घेतला की त्यांचे स्मरण अहोरात्र करावयाचे असते. सदगुरुंनी दिलेल्या नामात खूप मोठी शक्ती असते. आपल्या शिष्याच्या पाठीशी उभे राहून ते नाम त्यांच्याकडून पूर्ण करून घेतात. सदगुरुच सर्व काही करून घेतात. सदगुरु सर्व काही करून घेत असल्यामुळे साधकात अहंकाराला वाव नसतो. सदगुरु कडून अनुग्रह घेतला की दुसऱ्या कोणत्याही संतांकडून अनुग्रह घेऊ नये अशी संकल्पना आहे. त्यांच्याशी एकनिष्ठेने राहावे. एक गुरु, एक नाम, असावे. त्यांनी दिलेल्या नामात भगवंताचे प्रेम असते.




सदगुरुंची प्राप्ती झाल्यानंतर गुरु सेवा करणे हे शिष्याचे परम कर्तव्य आहे. गुरु सेवेमध्ये त्यांची आज्ञा पाळणे, मनात कोणतीही शंका न ठेवता होता त्यांनी सांगितलेली साधना नित्यनेमाने प्रेमाने करावी. तसेच साधकाची संपूर्ण शरणागती असावी. शरण जाणे म्हणजे सदगुरु ठेवतील त्या अवस्थेत समाधान मानणे आणि समाधानात राहणे. त्यांच्या इच्छेत आपली इच्छा मिसळणे. कोणत्याही परिस्थितीत नाम घेण्याचे सोडू नये. नामावर, सदगुरुवर पूर्ण विश्वास श्रद्धा ठेवणे. थोडक्यात सदगुरुचे होऊन राहणे हे महत्त्वाचे आहे. आपला सर्व भार सदगुरु वर सोपवावा.

सदगुरुसारिखा असता पाठीराखा
इतरांचा लेखा कोण करी

सदगुरुंना जे शरण जातात त्यांचा कार्यभार सदगुरु उचलतात. त्यांच्या पाठीशी उभे राहतात. ते संकटकाळी त्यांना मदत करतात. सदगुरु नावाड्याचै करतात. भरकटलेली नौका किनाऱ्यावर लावतात. सदगुरुंचे अनुसंधान राखणे महत्त्वाचे आहे.

जेव्हा साधक अनुग्रह घेतो तेव्हा त्याचा तो दुसरा जन्म असतो. त्याच्या साधना काळात सदगुरु साधकाच्या जीवनाला, विचाराला, दिशा देतात. वेळोवेळी मार्गदर्शन करतात. जीवन सुपंथावर चालते. अध्यात्मध्यान होते ते त्यांचे कृपेनेच.सदगुरुंचा सहवास आनंद देणार असतो. गुरु पूर्णिमाला यथाशक्ती गुरुदक्षिणा देऊन सदगुरु पूजन करावे. गुरुसान्निध्यात रहावे आणि गुरुप्रसाद घेऊन पावन व्हावे. आपल्या सदगुरुंचे आशीर्वाद घ्यावेत.




# गूढतत्व ईश्वराचे.... दान हे गुरुत्वाचे.....

**ज्योतिर्मय साहित्य**

गुरुर्ब्रम्हा, गुरुर्विष्णु, गुरुर्देवो, महेश्वरा ।

गुरु: साक्षात परब्रम्ह तस्मै श्री गुरुवे नमः ।।

ही गुरुप्रशस्ती म्हणजेच गुरुविषयी वाटणारी कृतज्ञता आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांनी आपल्या कर्तृत्वाचे सर्व श्रेय आपले सद्गुरू निवृत्तीनाथ यांनाच दिलेले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मनाची जडणघडण माता जिजाऊ यांनी केली. वारंवार सांगण्याचा उद्देश हाच की, शिष्याच्या मोठेपणाला गुरूंकडून मिळालेली शिकवण हीच कारण असल्याची भावना व्यक्त होते...आपल्या गुरूंनी (आई -बाबांनी) आपल्यावर केलेले योग्य संस्कार, जगण्याची सकारात्मक दृष्टी, त्यांनी शिकवलेले सद्विवेक, शिस्तप्रियता यामुळे भारतीय संस्कृती सर्वोत्तम श्रेष्ठ आहे.

आपण जन्मल्यापासून आपले गुरुवर्य -मार्गदर्शक आपलेच आई -बाबा असतात....


गुरु -शिष्य परंपरा हा भारतीय संस्कृतीचा पाया आहे. गुरूने आपल्याला जगण्याचे शहाणपण दिले आहे असे मनापासून वाटत असेल तर गुरुप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची प्रथा आपली संस्कृती सांगते. पुरातन काळातील विश्वातले सर्वकष ज्ञान म्हणजे वेद, पुराणे अनेक ग्रंथरचना मानले तर महर्षी व्यास यांना गुरु मानणे अपरिहार्य होते. गुरुचे गुरुत्व सहज निश्चित होते. व्यासांच्या बुद्धीमत्तेची किमया फार मोठी, त्यांचा आस मोठा... म्हणून त्यांच्या ज्ञानाचा व्यास मोठा. कदाचित म्हणूनच त्यांना व्यास हे नाव मिळाले असावे.

व्यासपीठ हा शब्दही ह्या अलौकिक व्यक्तीच्या नावापासून निर्माण झाला.

सदगुणांचा जाणतेपणा देतो तोच खरा गुरु. सद्गुरूपेक्षा मोठे सत्य नाही. गुरु सर्व सिद्धीचे कारण आहे. कारण तो नम्र आहे. गुरुविद्वत्तेच्या व सदगुणांच्या भाराने वाकलेला आहे. म्हणूनच स्वतः अद्वितीय बुद्धीमत्ता असतांनाही ज्ञानोबा माऊलींनी आपले वडीलबंधू निवृत्तीनाथांना गुरु मानले. गुरु म्हणजे श्रेष्ठ व जेष्ठ असा गुरुमाहिमा आपल्या संतांनी सांगितलेला आहे.

गुरुचरित्र मध्ये साक्षात ईश्वराने गुरुगीतेतून गुरुची महानता वर्णीली आहे. कोणतीही अपेक्षा न ठेवता अत्यंत निष्ठेने, मनापासून केलेली गुरुभक्ती हीच गुरुप्रेमाला कारण होते. म्हणूनच छत्रपती शिवाजी महाराजांना संत तुकाराम महाराजांची कृपा प्राप्त झाली.

अद्यतन -अनद्यतन काळातील गुरुशिष्याच्या संवादात तफावत पडेलही.. परंतु पूर्वापार चालत आलेल्या गुरु शिष्याच्या नात्यातील संदर्भ बदलता येणार नाहीत.




नव्या सामाजिक व्यवस्थेमध्ये गुरूंच्या कार्याचे स्वरूप बदलले. पूर्वीच्या काळी ज्ञानाचा स्रोत एकच होता... तो म्हणजे गुरुमुख. ज्ञानसाधनेचा दुसरा मार्ग उपलब्ध नव्हता. गुरु हा एकमेव ज्ञानसागर होता. तेव्हा गुरूंच्या ज्ञानाची उंचीही उच्च कोटीची होती. म्हणूनच गुरुविषयी नकळत श्रद्धा, आदर, भक्ती हे स्थान निर्माण व्हायचे. परंतु आजच्या युगात संगणकद्वारे ज्ञानाचे भांडार विद्यार्थ्यांच्या समोर खुले आहे. अर्थातच.... गुरुमुखातून ज्ञानसाधना तुलनेने कमी झालेली आहे. पूर्वी शिक्षकांनी फार मेहनतीने ज्ञान प्राप्त केलेले होते... विद्यार्थी ते ज्ञान आत्मसात करण्यासाठी आसावलेले असायचे.




आजच्या काळातही आदर्श शिक्षक सर्व उपलब्ध साधने अध्यापनासाठी वापरून विद्यार्थ्यांसोबत उत्तम संवाद साधून आपले कर्तव्य पार पाडत आहेत. नामवंत शिक्षकांची हीच लक्षणे प्रभावी आहे. गुरूंचे प्रत्यक्ष सानिध्य हाच शिष्याचा यशस्वीतेचा मार्ग आहे. (प्रत्येक शिक्षक सानेगुरुजी होऊ शकत नाही ). प्रत्येक शिक्षक विद्यार्थ्यांशी समरस होतो असेही नाही पण जो शिक्षक विद्यार्थ्याला आतून समजून घेतो तो शिक्षक त्या विद्यार्थ्यांचा खरा गुरुवर्य असतो. शिक्षकांची समरसता विद्यार्थ्यांच्या जीवनात आनंद देऊन जाते. शालेय विद्यार्थ्यांचा जास्तीत जास्त टक्का शिक्षकांच्या प्रभावाखालीच असतो. सहज केलेली कृतीसुद्धा मुलांच्या भविष्यावर परिणाम घडवते. पूर्वीच्या आणि आताच्या सर्व काळातील गुरु -शिष्य परंपरेत फरक पडला असला तरी त्यातील भावनिक सूत्रे समान आहेत. कोणत्याही विद्यार्थ्यांमध्ये गुरुनिष्ठा उपजत नसतेच... ती पालकांच्या सुसंस्कारातून संपादन केली जाते. सोबतच गुरूंच्या भावनिक सुसंवादातून, ज्ञानातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवली जाते. अत्यंत हलाखी-गरिबीत वाढलेला विद्यार्थीसुद्धा आदर्श गुरुपद लाभल्यावर कर्तबगार होतो. पुढील संपूर्ण आयुष्यात आपल्या गुरुबद्दल आदर ठेऊन जगत असतो.

माझे गुरु माझेच आई-बाबा... (घरी आणि शाळेतही)

मला अभिमान आहे की, माझे आई -बाबा आदर्श शिक्षक म्हणून ओळखले जातात. ज्यांनी शाळेतील प्रत्येक विद्यार्थी योग्य घडवण्यासाठी जिद्दीने अतीपरिश्रम घेतले. आई -बाबा कोणताही विद्यार्थी मागे राहायला नको म्हणून अवघड विषय लेकरांना घरी बोलावून त्याला येईपर्यंत शिकवीत राहायचे.... हेच आयुष्य घडवीणारे ज्ञानमंदिर हे वाक्य आजही त्यांच्या प्रत्येक विद्यार्थ्यांना आठवते. ''कोणत्याही वेळेवर उद्धवलेल्या बिकट परिस्थितीचा संयमाने सामना करून योग्यतेचा मार्ग शोधायचा..''हे धैर्यशील वाक्य आई -बाबा आम्हाला उदाहरण देऊन पटवून द्यायचे...आई-बाबांचे सर्व विद्यार्थिनी, विद्यार्थी आजही भेटतात तर फार स्वाभिमानाने बोलतात आम्हाला आई आणि बाबांनी घडवलं...माझी ताई आज पदाधिकारी आहे. मात्र आई -बाबांसारखे असंख्य विद्यार्थी घडवणारी एक प्रभावी गुरुवर्य आहे. आज कित्येक माझ्या बालमैत्रिणी माझ्या आई --बाबांचा आदर्श आणि शिस्तप्रियता बोलतात.. मन भरून पावतं. सांगायचं इतकंच की.. आदर्श शिक्षक विद्यार्थ्यांचा गुरुवर्य असतोच... पण विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा योग्य दिशादर्शकसुद्धा असतो..... ''श्री गुरुवे नमः ''.....

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# अज्ञानाकडून प्रकाशाकडे : एक अलौकिक वाटचाल

ज्योतिर्मय 📖 साहित्य

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः, गुरुर्देवो महेश्वरः ।

गुरुः साक्षात परब्रह्म, तस्मै श्रीगुरवे नमः ।।

ज्याप्रमाणे अथांग अंधाराला चिरत जाणारी सूर्याची एक छोटीशी किरण संपूर्ण सृष्टीला चैतन्याने न्हाऊ घालते, अगदी त्याचप्रमाणे मानवी मनातील अज्ञानाचा, अहंकाराचा आणि संशयाचा अंधार दूर करून तिथे ज्ञानाचा नंदादीप प्रज्वलित करणारे अद्भुत तत्त्व म्हणजे 'गुरू'! आषाढाचे घनदाट मेघ जेव्हा नभाला वेढून टाकतात, तेव्हा मनाच्या गाभाऱ्यात कृतज्ञतेचा मोगरा फुलवणारा एक पावन दिवस उजाडतो तो म्हणजे गुरुपौर्णिमा!




भारतीय संस्कृतीच्या विशाल पटावर अनेक सण-उत्सव आले आणि गेले, पण गुरुपौर्णिमेचे स्थान अढळ आणि अलौकिक आहे. हा केवळ एका दिवसाचा उत्सव नाही, तर तो मानवी आत्म्याने चैतन्याच्या महासागराकडे घेतलेली एक आर्त झेप आहे. गु म्हणजे अंधकार आणि रु म्हणजे प्रकाशाचा आविष्कार. जो आपल्याला संकुचिततेच्या अंधारातून बाहेर काढून, विशालतेच्या दिव्य प्रकाशाकडे नेतो, तोच खरा गुरू.

सौ. भामिनी महाले
पिंपळे सौदागर, पुणे.
मो. 9588691023



शब्दांना लाभते धार, गुरूंच्याच एका स्पर्शाने,
भाग्याचा उगवतो सूर्य, त्यांच्याच आशीर्वादाने.
जगाच्या या अथांग पसाऱ्यात,
जो विवेकाचा मार्ग दाखवतो,
तोच एक गुरू मनाच्या गाभाऱ्यात,
देवासारखा पूजला जातो!

या पवित्र दिवसाला 'व्यास पौर्णिमा' असेही संबोधिले जाते. मानवी बुद्धीचे आणि ज्ञानाचे शिखर मानले गेलेले महर्षी वेदव्यास यांचा हा जन्मोत्सव! ज्यांनी चार वेदांचे वर्गीकरण केले, महाभारतासारखा महाग्रंथ लिहिला आणि मानवाच्या जगण्याला एक सनातन आचारसंहिता दिली. व्यासोच्छिष्टं जगत्सर्वम्... अर्थात या जगातील ज्ञान महर्षी व्यासांच्या वाणीतूनच प्रगटले आहे. अशा आद्यगुरूंना वंदन करण्याचा हा दिवस.

आपल्या संस्कृतीने गुरूला ईश्वरापेक्षाही मोठे स्थान दिले आहे. संत कबीर एका दोह्यात अत्यंत सुंदरपणे लिहितात.

''गुरू गोविंद दोऊ खडे, काके लागूं पाय।
बलिहारी गुरू आपने, गोविंद दियो बताय।।''

जर ईश्वर आणि गुरू दोन्ही एकाच वेळी समोर उभे ठाकले, तर मी आधी गुरूंच्या चरणी नतमस्तक होईन; कारण ईश्वरापर्यंत पोहोचण्याचा मार्गही मला गुरूंनीच दाखवला आहे. सृष्टीचा निर्माता ब्रह्मा, पालनकर्ता विष्णू आणि संहारकर्ता महेश हे सर्व गुरू रूपातच सामावलेले आहेत.

आजच्या या धावपळीच्या, यांत्रिक आणि भौतिकवादी युगात गुरुपौर्णिमेचे महत्त्व अधिकच वाढले आहे. आज माणसाकडे माहितीचा महापूर आहे, आधुनिक तंत्रज्ञानामुळे क्षणार्धात जग हाताशी येते, पण त्या माहितीचे 'ज्ञानात' रूपांतर करण्याची किमया फक्त गुरूच करू शकतात. माहिती माणसाला हुशार बनवू शकते, पण संस्कार आणि विवेक फक्त गुरूच देऊ शकतात.

गुरू केवळ आध्यात्मिक क्षेत्रातच असतात असे नाही. जन्माला आल्यानंतर ज्या मातेने आपल्याला पहिला शब्द शिकवला ती माता आपली पहिली गुरू आहे. बोट धरून जगायला शिकवणारे पिता आपले गुरू आहेत. शाळेत अक्षरांची ओळख करून देणारे शिक्षक गुरू आहेत. इतकेच काय, तर अपयशाच्या गर्तेतून उठून पुन्हा लढण्याची प्रेरणा देणारी प्रत्येक व्यक्ती, प्रत्येक प्रसंग आणि निसर्गाचा प्रत्येक कण आपला गुरू असू शकतो. गरज आहे ती फक्त एक सच्चा शिष्य बनण्याची. कारण जोपर्यंत पाटी कोरी नसते, तोपर्यंत त्यावर ज्ञानाची अक्षरे उमटत नाहीत. शिष्याची नम्रता जेवढी अथांग, तेवढीच गुरूंची कृपा अपरंपार!

चला तर मग, या पावन दिनी आपल्या आयुष्याला आकार देणाऱ्या, पंखात बळ देणाऱ्या आणि आत्म्याला प्रकाशाची अनुभूती देणाऱ्या प्रत्येक ज्ञात-अज्ञात गुरूच्या चरणी नतमस्तक होऊया आणि कृतज्ञतेचे अर्घ्य अर्पण करूया!

पाटीवरच्या अक्षरांना,
ज्यांनी सुंदर जीवन केले,
मातीच्या त्या गोळ्याला,
ज्यांनी माणुसकीचे रूप दिले.
काय देऊ गुरुदक्षिणा,
या लहानशा आयुष्यात,
सर्वस्व वाहून चरणी, कृतार्थ झाले या जगात!
गुरुचरणारविंदार्पणमस्तु ।।

# गुरुपौर्णिमा आणि महत्त्व

ज्योतिर्मय 📖 साहित्य

गुरूर्ब्रह्मा गुरूर्विष्णु गुरूर्देवो महेश्वर
गुरू साक्षात परब्रह्म तस्मै श्री गुरवे नम.

गुरूर्ब्रह्मा = गुरू म्हणजे ब्रह्मा आहेत
गुरूर्विष्णु = गुरू म्हणजे विष्णू आहेत
गुरूर्देवो महेश्वरः = गुरू म्हणजे महादेव शिव आहेत
गुरू साक्षात परब्रह्म आहेत
तस्मै श्री गुरवे नमः
त्या श्री गुरूंना मी नमन करतो

हा श्लोक गुरूचे स्थान देवापेक्षाही मोठे आहे ,असे सांगतो.

१. गुरूर्ब्रह्मा - जसे ब्रह्मदेवाने सृष्टीची निर्मिती केली, तसेच गुरू आपल्यात नवीन विचारांची निर्मिती करतात. अज्ञानातून ज्ञानाकडे नेणारी निर्मिती असते ही.

२. गुरूर्विष्णु - जसे भगवान विष्णू सृष्टीचे पालन करतात, तसेच गुरू आपल्या ज्ञानाचे, संस्कारांचे आणि चांगल्या गुणांचे रक्षण करतात. चुकीच्या वाटेवर जाऊ नये म्हणून सांभाळतात.

३. गुरूर्देवो महेश्वरः - जसे शिव शंकर वाईटाचा नाश करतात, तसेच गुरू आपल्या मनातील अज्ञान, अहंकार, भीती आणि वाईट विचारांचा, सवयींचा नाश करतात.

४. गुरू साक्षात परब्रह्म - या तिन्ही गोष्टी निर्मिती, पालन आणि नाश करणारा गुरू म्हणजेच साक्षात परमेश्वर आहे. गुरूमध्ये संपूर्ण ब्रह्मांड सामावले आहे असे मानले जाते.

५. तस्मै श्री गुरवे नम - म्हणून त्या गुरूंना मी मनापासून वंदन करतो.

थोडक्यात लिहायचे झाल्यास, गुरू हेच आपले ब्रह्मा, विष्णू आणि महेश आहेत.

ते आपल्याला घडवतात, सांभाळतात आणि वाईटापासून वाचवतात.

म्हणूनच गुरूंचे स्थान ईश्वरापेक्षाही श्रेष्ठ मानल्या गेले आहे.

गुरु गोविंद दोऊ खड़े, काके लागूं पाय
बलिहारी गुरु आपने, गोविंद दियो मिलाय

म्हणजे देवापर्यंत पोहोचवणारा गुरूच आहे, म्हणून आधी गुरूला नमन

सविस्तर विचार करता ,

पुरातन काळापासून आपल्या भारत देशात सण वार संस्कृती आणि परंपरेला फार महत्व आहे.

यामुळे सुविचार, सुवर्तन आणि उच्च संस्कार याची बीजे पेरली जातात आणि पुढील पिढी विवेकाची निर्माण होण्याची शक्यता वाढते, असे म्हटले तर चुकीचे ठरू नये.




आज २९ जुलै आहे. आज गुरुपौर्णिमा आहे.

आषाढ महिन्यातील पौर्णिमा, वर्षातील सर्वात तेजस्वी पौर्णिमांपैकी एक. या दिवशी चंद्र पूर्णत्वाला जातो, तसेच शिष्याच्या जीवनात गुरूच्या कृपेने ज्ञानाचे पूर्णत्व येते. म्हणूनच या दिवसाला गुरू पौर्णिमा किंवा व्यास पौर्णिमा असे म्हणतात.

याच दिवशी महर्षी कृष्ण द्वैपायन वेदव्यासांचा जन्म झाला. त्यांनी वेदांचे चार भाग केले - ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद. महाभारत, १८ पुराणे, श्रीमद्भागवत यांसारखे ग्रंथ लिहून त्यांनी संपूर्ण मानवजातीला ज्ञानाचा ठेवा दिला. म्हणूनच त्यांना आदि गुरू मानले जाते.

योगी लोक या दिवशी शिवाला आदि योगी आणि आदि गुरू मानून त्यांची पूजा करतात.

थोडक्यात, गुरू पौर्णिमा ही केवळ एका व्यक्तीची नव्हे, तर ज्ञान परंपरेची पूजा आहे.

गुरू या शब्दाचा अर्थ( संस्कृत नुसार) गुरु म्हणजे अंधकार नष्ट करणारा असा सोपा अर्थ आहे.

जो आपल्या मनातील अज्ञान, भीती, संभ्रमाचा अंधकार दूर करून आशा, आत्मविश्वास आणि ज्ञानाचा प्रकाश देतो तो म्हणजेच गुरू होय.

आपल्या आयुष्यात येणारे पहिले गुरू, जे चालायला,बोलायला शिकवतात ते म्हणजे आपले आई वडील.

त्यानंतर येतात ते आपल्याला ज्ञान देऊन उपकृत करणारे आपल्या आयुष्यात येणारे शिक्षक वृंद

आणि पुढे अध्यात्मिक गुरु येतात.

आणखी म्हणजे असे खरे मित्र, जे आपल्या चुका दाखवतात आणि सावरतात, ते मित्र असले तरी चुकीच्या वाटेवरून जाऊ देत नाहीत म्हणून त्यांनाही गुरु मानावे असे आपली संस्कृती सांगते.

आपले अनुभव, जे अपयशातून धडा देतात, पुस्तके, जी मूकपणे मार्गदर्शन करतात, त्यामुळे ते ही गुरु होऊ शकतात.

आजच्या डिजिटल युगात यू ट्यूब, गुगल, ए आय हे माहितीचे गुरू झाले. पण माहिती आणि ज्ञान यात फरक आहे.

माहिती डोक्यात जाते, पण ज्ञान वाढवून देऊन ते आचरणात आणून देण्याचे काम फक्त खरा गुरूच करू शकतो.



गिरीश वसेकर ( देशपांडे)
नांदेड सिटी, पुणे ९४२२६५९४००

आजच्या स्पर्धेच्या युगात आपण पैसा, प्रसिद्धीच्या मागे धावताना अनेकदा नाती, संस्कार आणि मानसिक शांती विसरते. अशा वेळी गुरू पौर्णिमा आपल्याला आठवण करून देते आपले अमूल्य संस्कार, संस्कृती आणि परंपरेची.

आपण कुठून आलो ?आपले संस्कार काय आहेत? हे कुणीही कधीही विसरू नये.

कुणी आपल्याला एक शब्द जरी शिकवला त्यांचे ऋण मानने गरजेचे असते.

माणूस हा आयुष्यभर विद्यार्थी असतो. त्याने कायम नवे नवे शिकले पाहिजे.

वय, परिस्थिती ही शिकण्यात अडथळा नाहीच. आयुष्याच्या कोणत्याही टप्प्यावर नवीन शिकण्याची सुरुवात करता येते .

आपण जे शिकलोत ते पुढच्या पिढीला देणेही गरजेचे असते.

आपल्या सर्वांना बऱ्याच कथा माहित आहेत.

एकलव्य आणि द्रोणाचार्य: मूर्तीसमोर धनुर्विद्या शिकूनही निष्ठा न सोडणारा शिष्य.

स्वामी विवेकानंद आणि रामकृष्ण परमहंस: प्रश्न विचारून उत्तर मिळवणारा आणि जगाला भारताचा संदेश देणारा शिष्य.

संत ज्ञानेश्वर आणि निवृत्तीनाथ: वयाने लहान असूनही ज्ञानाने मोठे झालेले शिष्य.

या सगळ्या नात्यांमध्ये एक गोष्ट समान आहे ती म्हणजे आदर, समर्पण आणि शिकण्याची तळमळ.

गुरू पौर्णिमेला काय करावे?

घरात : १. आई-वडिलांना नतमस्तक व्हावे, त्यांचा आशीर्वाद घ्यावा. २. शिक्षक, मार्गदर्शक यांना फोन करावा किंवा भेटावे आणि त्यांचेही नमस्कार करून आशिर्वाद घ्यावे. त्यांना सांगावे ''तुमच्यामुळे मी आज इथे आहे''

गुरूंचा सन्मान करताना पैसा, भेटवस्तू दक्षिणा म्हणून देणे हा एक भाग आहे, पण गुरूंचा खरा सन्मान म्हणजे त्यांनी दिलेले संस्कार आचरणात आणणे हेच होय.

सर्वांनी नाती, संस्कृती, प्रेम, स्नेहभाव माया, आदरभाव आणि मैत्री जपावी, माणुसकीचा दिवा उजळत ठेवावा, प्रगतीच्या वाटेवर चालताना माती, नाती, संस्कार आणि संस्कृती कधीच विसरू नये. हेच तर आपले गुरू आपल्याला सांगत असतात. आपण मोठी स्वप्ने पाहू, खूप पुढे जाऊ पण मागे वळून पाहताना त्या हातांकडे पहावे, ज्यांनी आपल्याला आधार देऊन उभं केलं, जीवन जगणं शिकवलं, त्यांना वंदन करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे.

माझ्या स्वलिखित कवितेने या लेखाचा शेवट करतो

माझे गुरू
प्रथम चरणी माझे जन्मदाते
संस्काराचे दाते माता पिता
द्वितीय चरणी माझे गुरुजन
करी ज्ञानदान अखंडित
तृतीय चरणी अध्यात्मिक शक्ती
मज शिकवीती जन्ममुल्य
चतुर्थीच्या स्थानी अनुभव देती
अश्या साऱ्या व्यक्ती माझे गुरू
पंचमेच्या स्थानी संकट समयी
मदतीस येई अशी सारी.

गुरुपौर्णिमेच्या सर्वांना खूप खूप शुभेच्छा देतो आणि येथे थांबतो.


# व्यास पौर्णिमा : दासबोधाच्या प्रकाशात गुरुतत्त्वाचे महात्म्य (भाग १)

ज्योतिर्मय 📖 साहित्य

व्यासाय विष्णुरूपाय व्यासरूपाय विष्णवे।

नमो वै ब्रह्मनिधये वासिष्ठाय नमो नमः।।

हा श्लोक व्यासपूजनाच्या वेळी प्रामुख्याने म्हटला जातो. भारतीय संस्कृतीतील गुरु-शिष्य परंपरा ही जगातील सर्वांत प्राचीन आणि समृद्ध परंपरांपैकी एक मानली जाते. या परंपरेचा उगम वैदिक काळात झाला असून तिच्या विकासात महर्षी वेदव्यास यांचे योगदान अतुलनीय आहे, म्हणूनच आषाढ पौर्णिमेला साजरी होणारी व्यास पौर्णिमा ही केवळ एका महान ऋषीची जयंती नसून संपूर्ण भारतीय ज्ञानपरंपरेचा उत्सव आहे. या दिवशी गुरुंच्या चरणी कृतज्ञतेची पुष्पे अर्पण करून ज्ञान, विवेक आणि सदाचाराचा संकल्प केला जातो.



महर्षी वेदव्यास यांनी वेदांचे चार भागांत विभाजन करून त्यांचे जतन केले. महाभारत, ब्रह्मसूत्रे, अठरा पुराणे आणि श्रीमद्भागवत यांसारख्या ग्रंथांमुळे भारतीय तत्त्वज्ञान, धर्म, नीती आणि अध्यात्म सामान्य लोकांपर्यंत पोहोचले. म्हणूनच त्यांना आदिगुरू असे संबोधले जाते. व्यास पौर्णिमा म्हणजे ज्ञानाची अखंड वाहणारी गंगा स्मरण करण्याचा दिवस आहे. आपण सर्वजण सर्व धार्मिक व शुभ प्रसंगी जेंव्हा विधी सुरु करतो तेंव्हा आपले उपाध्ये (पुरोहित) सुरवातीला घरातील आईवडिलांना नमस्कार करायला सांगतात कारण, तैत्तरीय उपनिषदा ते सांगितलेलं आहे.

मातृदेवो भव।
पितृदेवो भव।
आचार्यदेवो भव।
अतिथिदेवो भव।। (तैत्तिरीय उपनिषद् (शिक्षावल्ली १.११)

याचा अर्थ आहे माता, पिता, आचार्य आणि अतिथी यांना देवतुल्य मान.

समर्थ रामदासस्वामींनी श्रीमद् दासबोध या ग्रंथातून गुरुतत्त्वाचे अत्यंत प्रभावी विवेचन केले आहे. दासबोध हा केवळ अध्यात्मग्रंथ नसून तो व्यवहार आणि परमार्थ यांचा समन्वय साधणारा जीवनग्रंथ आहे. समर्थांच्या मते मनुष्य जन्मतः अज्ञानी असतो; परंतु योग्य गुरुच्या मार्गदर्शनामुळे त्याच्या जीवनात विवेकाचा प्रकाश निर्माण होतो, म्हणूनच त्यांनी अनेक ठिकाणी सद्गुरूचे महत्त्व अधोरेखित केले आहे. दासबोधात समर्थांनी स्पष्ट सांगितले आहे की, केवळ ग्रंथांचे वाचन, शास्त्रांचा अभ्यास किंवा शब्दज्ञान यामुळे आत्मकल्याण होत नाही. अनुभवी सद्गुरूच्या मार्गदर्शनाखाली त्या ज्ञानाचे चिंतन, मनन आणि आचरण झाले, तरच त्याचे फळ प्राप्त होते. गुरु म्हणजे केवळ माहिती देणारा शिक्षक नव्हे, तर जीवनाला योग्य दिशा देणारा, मनातील संशय दूर करणारा आणि शिष्याच्या अंतरंगातील सुप्त शक्ती जागृत करणारा मार्गदर्शक होय. सहाजिकच मनात प्रश्न निर्माण होतो कि, कुणाकडे जावे, त्याचे उत्तर आपल्याला मिळते मुंडकोपनिषदामध्ये.

तद्विज्ञानार्थं स गुरुमेवाभिगच्छेत् समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम्।।(१.२.१२)

परब्रह्माचे ज्ञान प्राप्त करण्यासाठी श्रोत्रिय व ब्रह्मनिष्ठ अशा सद्गुरूकडे जावे.



शांडिल्यगोत्रोत्पन्नभालेरावमुकुन्दोहऽम्
छत्रपतीसम्भाजीनगरम्
विद्युतसन्देशसम्पर्कसूत्रम् -
bhalerao.mukund@gmail.com
भ्रमणभाषक्रमान्क - ८३०८८३५३१३

समर्थांच्या दृष्टीने सद्गुरू हा व्यक्तिपूजेचा विषय नाही. तो सत्याचा दूत आहे. सद्गुरू शिष्याला स्वतःवर अवलंबून ठेवत नाही; उलट त्याला स्वानुभवाने सत्य जाणण्याची प्रेरणा देतो, म्हणूनच दासबोधात विवेक, आत्मपरीक्षण, प्रयत्न आणि सत्संग यांना अत्यंत महत्त्व दिले आहे. गुरुकृपा म्हणजे चमत्कार नव्हे; तर योग्य विचार करण्याची क्षमता प्राप्त होणे, हा समर्थांचा अत्यंत व्यावहारिक संदेश आहे.

आजच्या माहितीच्या युगात असंख्य साधने उपलब्ध आहेत. इंटरनेट, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे ज्ञानाचे दरवाजे सर्वांसाठी उघडले गेले आहेत, परंतु माहितीचा प्रचंड साठा असला तरी सत्य-असत्य, योग्य-अयोग्य आणि शाश्वत-अशाश्वत यांचा विवेक प्रत्येकाला होत नाही. अशा वेळी दासबोधातील गुरुतत्त्व अधिकच महत्त्वाचे ठरते, कारण सद्गुरू माणसाला विचार करण्याची दिशा देतो; तो अंधानुकरण नव्हे तर स्वविवेक शिकवतो.

व्यास पौर्णिमेचा उत्सव साजरा करताना आपण गुरुंचे पूजन करतो; परंतु त्याहून महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या शिकवणीचे पालन करणे. गुरूंच्या आदर्शांचे आचरण करणे हीच खरी गुरुदक्षिणा आहे. समर्थ रामदासांच्या शिकवणीतून हा संदेश स्पष्टपणे उमटतो.

तैत्तिरीय उपनिषद् (शिक्षावल्ली १.११)

मातृदेवो भव।
पितृदेवो भव।
आचार्यदेवो भव।
अतिथिदेवो भव।।

माता, पिता, आचार्य आणि अतिथी यांना देवतुल्य मान.

क्रमशः भाग २ : व्यास पौर्णिमा : दासबोधाच्या प्रकाशात गुरुतत्त्वाचे महात्म्य

# गुरूच्या ज्ञानरुपी मार्गदर्शनाने आत्मिक बल मिळते

ज्योतिर्मय 📖 साहित्य


या भूतलावर प्रत्येक व्यक्ती जीवनात चढ-उतार येतात, हे चढ उतार जीवनाला जर्जर करतात तेंव्हा ती व्यक्ती एका मार्गदर्शकाच्या शोधात असते. जीवनातील चढ - उताराना सामोरे जाण्यासाठी त्या व्यक्तीला आत्मबलाची व आत्मविश्वासाची नितांत गरज असते.




अशा समयी व्यक्तीला धीर देणारा, व्यक्तीच्या हताश व निराश पणाला घालविण्यासाठी व त्या व्यक्तीला सुमार्ग दाखविण्यासाठी, सकारात्मक मार्ग दाखविण्यासाठी त्याला आधार देणारा, त्याला धीर देणारा मार्गदर्शक म्हणजेच गुरू होय.व्यक्तीला गुरू जीवनाचा आधार असतो. माझ्या पाठीशी गुरू आहे,मला गुरूचा आधार आहे, गुरू मला मार्गदर्शन करणार आहे.या आत्मिक व मानसिक बळावर त्या व्यक्तीच्या जीवनात अशक्य बाबी ही सहज शकतेत बदलतात, व गुरूच्या कृपाशीर्वादाने, तथा केलेल्या सकारात्मक मार्गाने ती व्यक्ती सुकर होते. जीवनाला अशा पध्दतीने सकारात्मक मार्ग दर्शन करणाऱ्या त्या सभ्य व ज्ञानी व्यक्तीला'' गुरू''संबोधले जाते. या साठीच समाजात गुरू केला जातो. सदरील गुरू आपल्या शिष्याला जीवन जगण्याचा सुमार्ग दाखवितात. ज्यामुळे या शिष्यच्या जीवनात ओढवणाऱ्या प्रसंग व घटनामुळे तो शिष्य गोंधळून न जाता वेळीच सावरतो. गुरू शब्दांचा अर्थ ''गु'' म्हणजे अंधार व ''रु'' म्हणजे दूर करणारा म्हणजेच शिष्याच्या जीवनातील प्रसंग, समस्या, अडचणी, प्रश्न या बाबत मार्गदर्शन करून आपल्या शिष्याला योग्य मार्ग दाखविणारा व्यक्ती म्हणजेच गुरू होय. थोडक्यात असे म्हणता येईल की जो गुरू आपल्या शिष्याच्या जीवनातील समस्यारुपी ''गु'' म्हणजे अंधार व ''रु'' म्हणजे दूर करणे म्हणजे समस्या दूर करून आनंद देतो त्याला''गुरू''असे संबोधल्या जाते.

गुरूच्या ज्ञानाने शिष्याचे जीवन सुखमयी होणे म्हणजे प्रकाशमय होणे वत्या शिष्याचेआत्मिक व बौद्धिक बल वाढविल्या जाते. गुरू म्हणजे आपल्या मार्गदर्शनाने शिष्याच्या जीवनात ज्ञानरूपी प्रकाश आणणारा महात्मा होय.

धोंडीरामसिंह ध. राजपूत
वैजापूर, छत्रपती संभाजीनगर
मो. ९४२१३१२२४४



आपल्या ज्ञानाने शिष्याला परिपूर्णत्व मिळवून देणारा महात्मा होय. गुरू पौर्णिमेला व्यास पौर्णिमा ही म्हणतात. या दिवशी व्यासांची आठवण मोठया आदराने केली जाते.

गुरूंच्या ज्ञानाने शिष्याचे जीवन प्रकाशमय तर होतेच मात्र याशिवाय शिष्याचे आत्मिक बल वाढते. आत्मिक क्षमता शिष्यात येते. या आत्मिक क्षमतेच्या बळावर शिष्य जीवनातील चढ-उतार,समस्या,अपयश यावर सहज मात करून जीवन समाधानाने जगतो.गुरूच्या मार्गदर्शनाने शिष्याच्या जीवनात स्थिरता येते, शिष्याच्या विचार व कृतीला योग्य दिशा मिळते. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात त्या व्यक्तीची आई ही सर्वश्रेष्ठ गुरू होय. गुरुसेवेने परीपूर्णतः येते.

***


# ज्ञानसूर्य महर्षी वेदव्यास एका अलौकिक जीवनप्रवासाची कथा

ज्योतिर्मय साहित्य

तपोवनातील बालपणीचा ध्यास

गंगा आणि यमुनेच्या पवित्र संगमाजवळील एका शांत, नयनरम्य बेटावर एका तेजस्वी बालकाचा जन्म झाला. पिता पराशर ऋषींचे अगाध ज्ञान आणि माता सत्यवतीची अलौकिक माया यांच्या छायेत हे बालक लहानाचे मोठे होऊ लागले. बेटावर (द्विपावर) जन्म झाल्यामुळे आणि अंगावर सावळ्या (कृष्ण) रंगाची सुंदर झाक असल्यामुळे माता-पिता त्यांना प्रेमाने 'कृष्णद्वैपायन' असे म्हणत. तर पराशर ऋषींचे पुत्र म्हणून त्यांना समाज 'पाराशर्य' या नावानेही ओळखू लागला.

बालपणापासूनच कृष्णद्वैपायन यांच्या मनात संसाराच्या ऐहिक सुखांपेक्षा अध्यात्माची, परम सत्याची आणि ज्ञानसाधनेची ओढ तीव्र होती. वयाच्या अगदी छोट्या टप्प्यावर त्यांनी मातेकडे जाऊन वनात तपश्चर्चेसाठी जाण्याची अनुमती मागितली. मातेचा आशीर्वाद घेऊन त्यांनी घोर अरण्यात प्रवेश केला. तेथे त्यांनी अत्यंत कठोर ज्ञानसाधना व तपश्चर्या केली. या तपाच्या तेजाने त्यांना संस्कृत भाषेचे संपूर्ण मर्म, सृष्टीचे गूढ नियम आणि अलौकिक ज्ञानाची प्राप्ती झाली.




२. वेदविभागणीचा महान यज्ञ

त्या काळात मानवी समाजाकडे ज्ञानाचा अथांग साठा होता, पण तो सर्व 'वेद' नावाच्या एकाच विशाल राशीमध्ये एकत्र गुंफलेला होता. काळ बदलत होता, मानवी बुद्धी आणि स्मरणशक्ती मर्यादांमध्ये बांधली जात होती. एकच विशाल वेद पाठ करणे किंवा समजून घेणे सामान्य माणसालाच नव्हे, तर विद्वानांनाही कठीण जाऊ लागले होते.

हे पाहून कृष्णद्वैपायनांनी ज्ञानाच्या त्या अथांग सागराचे सुलभ आणि पद्धतशीर वर्गीकरण करायचे ठरवले. त्यांनी एका वर्तुळातील व्यासाप्रमाणे ज्ञानचक्राच्या दोन्ही टोकांना जोडणारे आणि निसर्गाच्या प्रवृत्ती व निवृत्ती या दोन्ही मार्गांचे सखोल विश्लेषण करणारे महान कार्य हाती घेतले. ज्ञानाचे स्पष्टीकरण (विशद) करून वेदांचे सुटसुटीत भाग पाडले, म्हणूनच जगाने त्यांना आदराने 'व्यास' ही पदवी दिली.

व्यासांनी ज्ञानराशीचे चार मुख्य भाग केले:

ऋग्वेद: त्यांनी सर्व ऋचा (छंदोबद्ध मंत) एकत्र करून ज्या स्तवनांचे पठण केले जाऊ शकते, त्यांचा ऋग्वेद तयार केला.

सामवेद: ज्या ऋचांचे मधुर गायन करता येते, त्यांना संगीतमय सामवेदात ग्रथित केले.

यजुर्वेद: यज्ञ-याग, कर्मकांड आणि विधींचे तपशीलवार वर्णन करणाऱ्या गद्य मंत्रांना यजुर्वेद हे नाव दिले.

अथर्ववेद: मानवी जीवनातील लौकिक व्यवहार, औषधी, आणि दैनंदिन रक्षणासाठी लागणाऱ्या मंत्रांचे संकलन करून अथर्ववेद रचला.

त्या काळातील सर्व श्रेष्ठ आचार्य आणि विद्वानांनी व्यासांच्या या अद्वितीय आणि वैज्ञानिक वर्गीकरणाला नतमस्तक होऊन मान्यता दिली.

३. महाभारत, पुराणे आणि ब्रह्मसूत्रांची निर्मिती

वेदांचे ज्ञान अत्यंत गूढ आणि क्लिष्ट होते. ते अगदी शेवटच्या घटकापर्यंत, सामान्यातील सामान्य माणसापर्यंत कसे पोहोचवायचे? या प्रश्नाचे उत्तर म्हणून व्यासांनी कथा आणि इतिहासाचे माध्यम निवडले.




त्यांनी 'महाभारत' या महाकाव्याची रचना केली. पांडव आणि कौरव यांच्या संघर्षाच्या कथेतून त्यांनी मानवी जीवनातील धर्म-अधर्म, सत्य-असत्य आणि चांगले-वाईट यातील सूक्ष्म भेद स्पष्ट केले. महाभारताच्या रूपात त्यांनी मानवी स्वभावाचा आणि जीवनमूल्यांचा एक भव्य आरसाच जगासमोर ठेवला.

त्यानंतरही त्यांचे ज्ञानसत्र थांबले नाही. त्यांनी अठरा महापुराणांची रचना केली, ज्यामध्ये 'भागवत पुराण' हे भक्तीचा आणि ज्ञानाचा शिरोमणी ग्रंथ ठरला. या पुराणांमध्ये त्यांनी सृष्टीच्या नियमांचे खालील ५ मुख्य भागांत वर्गीकरण करून रंजक कथांद्वारे ज्ञान दिले:

१. सर्ग: जगाची, निसर्गाची मूळ निर्मिती.

२. प्रतिसर्ग: प्रलयानंतर होणारी पुर्नरचना किंवा प्रलय.

३. मन्वंतर: काळाचे मोठे कालखंड आणि त्यातील जीवनमान.

४. वंश: देव, ऋषी आणि राजांची वंशावळ.

५. वंशानुरचित: त्या महान राजांचे आणि पुरुषांचे चरित्र.

याशिवाय उपनिषदांमधील परम सत्याचा गूढ अर्थ उलगडून दाखवण्यासाठी त्यांनी **ब्रह्मसूत्रां**ची रचना केली, ज्याने भारतीय तत्त्वज्ञानाला एक भक्कम वैचारिक पाया दिला.

४. गुरुपौर्णिमा आणि व्यासांचे अमर स्थान

व्यासांनी जगातील अशा कोणत्याही विषयाला सोडले नाही, ज्याचे विवरण त्यांनी आपल्या ग्रंथांमध्ये केले नाही. म्हणूनच ''व्यासोच्छिष्टं जगत्सर्वम्'' (म्हणजेच जगतातील सर्व ज्ञान हे व्यासांचे उष्टे आहे/व्यासांनी आधीच स्पर्श केलेले आहे) अशी म्हण रूढ झाली.

ज्या दिवशी महर्षी व्यासांचा जन्म झाला, तो आषाढ पौर्णिमेचा दिवस! आपल्या संस्कृतीने या महान ज्ञानसूर्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा दिवस 'गुरुपौर्णिमा' किंवा 'व्यासपौर्णिमा' म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली. जगतगुरू म्हणून महर्षी व्यास हे केवळ भूतकाळात होऊन गेलेले ऋषी नाहीत, तर ते आपल्या अवतीभवती विचारांच्या, ज्ञानाच्या आणि संस्कृतीच्या रूपात सदैव जिवंत आहेत.

आपली संपूर्ण भारतीय संस्कृती, आपली विचारसरणी आणि आमचे जीवनमूल्य हे व्यासांच्या महाभारत आणि पुराणांवर आधारित आहे. भारतीय संस्कृतीचे मूळ समजून घ्यायचे असेल, तर व्यासांच्या साहित्याचा अभ्यास करणे अपरिहार्य आहे. अशा या महान, दिव्योदात्त, परम विद्वान आणि सर्वश्रेष्ठ साहित्यकाराचा जन्म आपल्या भारतभूमीत झाला, हा आपल्यासाठी अनंत काळापर्यंत अभिमानाचा विषय आहे. गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वावर या आद्यगुरु महर्षी वेदव्यास यांच्या चरणी शतशः प्रणाम!

***

# गुरु : ईश्वराहून मोठे स्थान

ज्योतिर्मय साहित्य

माणसाच्या जीवनामध्ये गुरुचे स्थान अत्यंत महत्त्वाचं आहे. आपल्या दृष्टीने गुरु ला ईश्वराहून मोठं म्हटलं तरी चालेल. ईश्वर प्रत्येक ठिकाणी असतो परंतु तो तितक्या जीवांना समजतो ? प्रत्येक जीवातला सृष्टीतला, निसर्गाच्या प्रत्येक कणाकणात वसलेला ईश्वर समजून देण्याचं आणि त्याच्या पर्यंत पोहोचवण्याचं महत्त्वाचं कार्य गुरु करत असतात.




जो आपल्याहून अधिक बुद्धिमान, अनुभवी, समजदार, काहीतरी जास्त येणारा असा जो कोणीतरी सतत आपल्या कृतीतून वक्तव्यातून, कळकळीची विनंती करतो व इतरांना त्या बाबतीत सुधारण्याचा प्रयत्न करत असतो तोच तर गुरू असतो.

साधारणपणे आपण सुरुवातीला आई-वडिलांकडून, घरातील मोठ्या व्यक्तींकडून, समाजातील वयस्कर व्यक्तींकडून आणि शाळेतील शिक्षकांकडून काही तरी सतत शिकत असतो. तर काही व्यक्ती मात्र विशिष्ट विषयांची शिकवण देत असतात.

शिक्षण उद्देशाच्या दृष्टीने गुरु दोन प्रकारचे म्हणावे लागतील.

१: लौकिक गुरु : आई-वडील, शिक्षक आणि इतर. जगण्याचे नैतिक नियम शिकवणारे, आपल्यात सतत काही ना काही सुधारणा करणारे. भौतिकतेच्या विषयात व संसारासंबंधी जगण्याशी निगडित गोष्टी शिकवणारे त्यांनाही पर्यायाने गुरु म्हणावे लागेल.




२: लोकोत्तर गुरु : आध्यात्मिक शिक्षण देणारे, स्वतः साधनेमध्ये असून इतरांना साधना आदर्श, प्रशिक्षण देणारे, धर्माचे अनुकरण करत धर्माचा प्रसार करणारे, मुक्ती मार्गाचा स्वतः उद्देश धारण करून इतरांना त्या मार्गावर प्रवृत्त करणारे. अशा सर्व साधू संत प्रवर्तक महात्म्यांना गुरु म्हणतात.

आपल्याला सर्व काही समजतं असे नव्हे. ते जसं आहे तसं किंवा असेल तसं आणि त्याचे सत्य स्वरूप समजण्यासाठी गुरुची आवश्यकता असते. आपल्यामध्ये ज्ञान असतं परंतु ते निमित्ताने प्रगट होण्यास स्पष्ट होण्यास गुरुचे मोलाचे योगदान असते. दिवा असतो, वात असते, तेल असते परंतु त्याला प्रज्वलित करणारा कोणीतरी असावा लागतो. तोच तो गुरु.

मराठीत म्हटलं आहे ज्याच्या जीवनात गुरु त्याचे जीवन खऱ्या अर्थाने सुरू.

आपल्या जीवनाच्या उद्देशानुसार आपण गुरुची निवड केली पाहिजे. गुरु मध्येही उत्कृष्ट गुरु असतात. हिंदीमध्ये म्हणतात ;

पानी पीजे छान के, गुरु कीजे जान के

अर्थात्□ : यांच्याकडून आयुष्याचे जगण्याचे आणि मुक्तीचे तत्वज्ञान घ्यायचे आहे, ज्यांच्या मार्गाचे अनुसरण करायचे आहे, ज्यांच्या मागे मागे चालायचे आहे; तो गुरु देखील आपण योग्य असा निवडला पाहिजे. तर या ठिकाणी उत्कृष्ट गुरु कोणास म्हणावे मूळ शास्त्रात याचा उल्लेख आढळतो :

सर्वश्रेष्ठ सर्वोत्तम गुरु : जो

१ वितराग : राग द्वेषाने रहित २ सर्वज्ञ : ज्ञानी संपूर्ण ३ हितोपदेशी शास्त्राचा कर्ता सर्व जीवांना कल्याणकारी मार्ग दर्शवणारा असा आहे.

आपल्या जीवनाचा सर्वांगीण सुधार करत मुख्य उद्देशाकडे नेऊन पोहोचवणाऱ्या गुरुबद्दल आपल्याला सतत आदर व भक्ती भाव असला पाहिजे. गुरुच्या वचनावर इतकी श्रद्धा असायला हवी की ''गुरुचा शब्द आदेश आणि वाक्य प्रमाण'' असेच मानावे.

एकदा का गुरु जाणला, मानला की त्या आदरणीय गुरूंचे आपल्याकडे सतत लक्ष असते. ते आपल्यासमोर असोत अथवा नसोत, ते जवळ असोत अथवा दूर असोत, ते विद्यमान असोत अथवा निर्वाण स्थानी पोहोचलेले असोत. असतील तेथून गुरूंचे आपल्यावर सतत लक्ष असते. म्हणून वेळ संकटाची असो नसो, वेळ आनंदाची दुःखाची कुठलीही असेल ; वेळोवेळी आठवेल तेव्हा, शक्य होईल तेव्हा गुरुचे नामस्मरण करावे. एक अद्भुत शक्ती आपल्या सोबत असल्याचा अनुभव होईल.

म्हणून जीवनामध्ये गुरुचे स्थान ईश्वराहून देखील महत्त्वाचे आहे असेच मला वाटते. जय गुरुदेव

# गुरु-शिष्याची सद्यस्थिती चिंताजनक

ज्योतिर्मय साहित्य

२९ जुलै रोजी संपूर्ण देशात गुरुपौर्णिमा साजरी होत आहे. या पौर्णिमेला व्यास पौर्णिमा असेही म्हणतात. अंधाराकडून प्रकाशाकडे नेतो तो गुरु. आपल्या शिष्याचे जीवन उजळून निघावे आपला शिष्य आपल्यापेक्षा मोठा व्हावा, त्याची सर्वत्र कीर्ती व्हावी अशी ज्यांना मनातून वाटते तो सर्वश्रेष्ठ गुरु होय. हिंदू ,बौद्ध जैन धर्मात गुरुप्रती आदर दाखवण्याचा हा दिवस आहे. गुरु आणि शिष्य यांचे नाते अतूट आहे. गुरु व शिष्य यांचे नाते भावनिक असते. शैक्षणिक व आध्यात्मिक क्षेत्रात गुरूला मानाचे स्थान आहे.

कोणी बंधूंना तर कोणी मोठ्या व्यक्तींना आपले गुरु मानतात. काही महिला भगिंनी विचार पडणाऱ्या व्यक्तीला गुरु भाऊ म्हणून नाते तयार करताना दिसतात.

जुन्या काळात गुरु शिष्याच्या अनेक जोड्या प्रसिद्ध होत्या. रामकृष्ण परमहंस- स्वामी विवेकानंद, अर्जुन- द्रोणाचार्य, श्रीकृष्ण -सांदिपनी ,जनार्दन स्वामी- संत एकनाथ महाराज चाणक्य -चंद्रगुप्त, विश्वामित्र -राम श्रीकृष्ण -अर्जुन, श्री निवृत्तीनाथ व संत ज्ञानेश्वर माऊली आणि अलीकडील काळात रमाकांत आचरेकर- सचिन तेंडुलकर यांच्या जोड्या प्रसिद्ध आहेत. पूर्वी गुरुगृही राहून विद्या घेतली जात असे. आश्रमातील सर्व कामे शिष्य मनोभावे करत होते. त्यामुळे गुरु आणि शिष्य यांचे नाते फार जवळचे होते. काळानुसार गुरु -शिष्य परंपरा बदलत गेली शासनाच्या नवीन नियमानुसार विद्यार्थ्यांना शिक्षा करू नये. विद्यार्थ्यांना शिक्षा करायची नाही म्हणून त्यांना भीती राहिली नाही. शासनाच्या ध्येय धोरणानुसार शिक्षा कमी झाली. त्यामुळे विद्यार्थी मोकाट सुटले. त्यांचे वळण बिघडले आणि विद्यार्थी गुन्हेगारी क्षेत्राकडे वळू लागले. दररोज आपण पाहत आहोत की वेगवेगळ्या तक्रारी विद्यार्थ्यांच्या येत आहेत. हे विद्यार्थी गुंड प्रवृत्तीचे बनत आहेत. पालक आम्हांला एकच मुलगा आहे. असे म्हणून त्यांचे लाड पराकोटीला पोहोचले आहेत. काही पालकांनी शिक्षकांवर दबाव आणलेला आहे. शिक्षकांचे हात कायद्याने बांधले गेलेले आहेत.


विद्यार्थी हिंसक बनण्यासाठी अनेक कारणे कारणीभूत आहेत. गुरुपौर्णिमा साजरी करण्यासाठी सुद्धा शिष्यवर्ग उत्तम व चांगला असावा लागतो. शिक्षणाची सध्याची परिस्थिती थोड्याफार प्रमाणात निराशा जनक चालली आहे. विद्यार्थी बाहेर शिकवणी लावतात. त्यामुळे त्यांना दररोजच्या शिक्षकांचे महत्त्व वाटत नाही. समाजामधून शिक्षकांबद्दल काही गैरसमज निर्माण झाले आहेत. काही लोकप्रतिनिधी शिक्षकावर तोंड सुख घेत आहेत. त्यामुळे समाजात सुद्धा शिक्षकांची प्रतिष्ठा मलीन करण्याचा प्रयत्न केला जात आहे. कला, क्रीडा, अध्यात्म या क्षेत्रातील गुरु अतिशय महत्त्वाची भूमिका बजावतात. विद्यार्थी घरातूनच बिघडून बाहेर येत आहेत. सद्यपरिस्थितीत गुरु- शिष्य नात्यात औपचारिक पणा निर्माण झाला आहे. इतर व्यवसायासारखा शिक्षकी पेक्षा सुद्धा काही दिवसात व्यावसायिक होईल. गुरु बद्दल आदर, प्रेम श्रध्दा,भावना कमी कमी होत आहेत. याला अनेक गोष्टी कारणीभूत आहेत. सर्व दोष शिक्षकाला देता येत नाहीत. सध्या शैक्षणिक वातावरण व्यवस्थित राहिले नाही .ऑनलाइन पद्धतीने दररोज एक नवीन परिपत्रक निघत आहेत. अनेक ठिकाणी शिक्षकांना श्वान मोजणे, निवडणूक घेणे, निरक्षरना शिक्षित करणे, टोलनाक्यावर काम करणे, घरगणना, जनगणना करणे. इत्यादी कामामुळे तो त्रस्त झाला आहे.




सध्या कोणत्याही क्षेत्रातील व्यक्ती शिक्षण मंत्री होत आहेत. त्यामुळे शिक्षण क्षेत्राला मरगळ आली आहे. असे सर्वत्र दबक्या आवाजात चर्चा चालू आहे.

कुटुंबात आजी -आजोबा नसल्यामुळे बालक एकलकोंडे जीवन जगत आहेत. आई-वडिलांना स्वतःच्या मुलाकडे लक्ष द्यायला वेळ नाही. म्हणून काही मुलं त्रासदायक बनत आहेत. मोबाईल वरील अनेक रील्स पाहून ब-याच विद्यार्थ्यांचे मानसिक संतुलन बिघडत आहे. त्यामुळे गुरु शिष्याचे नाते आता मोडकळीस आले आहे. विद्यार्थ्यांना अनेक गोष्टी वर्गाच्या बाहेरून माहिती होत आहेत. ही वास्तविकता आपण जाणून घेतली पाहिजे. प्राचीन काळी किती तरी शिष्यांचे गुरुमुळे महत्त्व वाढले. गुरुमुळे जीवनामध्ये समानता आली. सद्य परिस्थिती मध्ये आश्रम पद्धती व गुरुकुल पद्धती बंद झाली

शिक्षणाला व्यवसायाचे रूप आले. त्यातून शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन समाजाचा ही बदलला. प्रचंड प्रमाणात फी वाढलेली आहे. शिक्षणाचे बाजारुकरण झाले आहे.




प्राचीन काळात गुरु, मास्तर, शिक्षक आणि आता आधुनिक काळात शिक्षण सेवक झाले. आज कायमस्वरूपी शिक्षक होण्यासाठी अनेक दिव्य पार करावे लागत आहेत. त्यातून विद्यार्थ्यांना थोडी जरी शाब्दिक जखम झाली तर अवघड होत आहे. पूर्वीच्या काळी विद्यार्थी चुकला की जबर शिक्षा केली जात होती. त्यामुळे विद्यार्थी आपोआप घडले जात होते.

आई-वडील, काका, मामा, मोठे बंधू, आजोबा आजी येऊन सांगत गुरुला सांगत असत.

आणखी कडक शिक्षा करा. पण आजची परिस्थिती ती राहिली नाही. लाडाने अनेक मुलं वेडे झाले आहेत. कारण त्यांचे लाड पाच मिनिटात आई-वडील पुरवत आहेत. त्यामुळे त्यांच्याकडे संयम राहिला नाही. त्यातून गुन्हेगारी क्षेत्राकडे वळत आहेत. अशी जर परिस्थिती निर्माण झाली तर पुढील काळात शिक्षण क्षेत्राचे व समाजाचे भविष्य अवघड आहे. यात तीळमात्र शंका नाही. खाजगी शिकवणी व इंग्रजीचे ज्ञान विद्यार्थ्यांना राहावे. म्हणून इंग्रजी माध्यमांच्या शाळेचे पेव सर्वत्र फ ुटले आहे.त्यामुळे मराठी शाळेवर परिणाम होऊन सुसंस्कृत समाज निर्माण होण्या ऐवजी मुलांवर केलेले संस्कार दीर्घकाळ टिकत नाहीत.ही शोकांतिका आहे. ऑनलाईन शिक्षणामुळे गुरुचे महत्व कमी होऊन समाजात गुरूना मानाचे स्थान म्हणावे तेवढे राहिले नाही. हे कटू सत्य आहे. शिक्षक हा राष्ट्राचा निर्माता आहे. असे बोलले जात असले तरी आजची परिस्थिती वेगळी झाली आहे. हे आपणाला मान्य करावे लागते. समाजाच्या जडणघडणी मध्ये शिक्षकांची भूमिका महत्त्वपूर्ण होती. त्यांच्या शब्दाला धार होती. गाव गाड्यांमध्ये गुरुच्या शब्दांला अनन्यसाधारण महत्त्व होते. गुरुर्ब्रह्मा गुरु विष्णु। गुरुर्देवो महेश्वरा।

गुरु साक्षात परब्रह्म ।तस्मै श्री गुरुवे नमः।।

खरोखर गुरु हा साक्षात परब्रह्म आहे. अशी शिकवण दिली जात होती. म्हणून गुरूला आचार्य देवो भव: असे ही म्हणतात. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांना आपले गुरु मानले. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांनी गार्की यांना गुरू मानले. गुरु द्रोणाचार्यांनी एकलव्याला अंगठा मागवला होता. असे मतभेद करणारे गुरु आम्हांला नकोत. हिंदू धर्मातील आद्य गुरु श्री दत्तात्रयांनी आपल्या जीवनात २४ गुरू केले होते. असे उल्लेख आढळतात.

गुरु हा अखंड वाहता ज्ञानाचा झरा आहे. मला घडवणाऱ्या माझ्या आई- वडीलांना व सर्व गुरूंना शिर साष्टांग दंडवत व प्रणाम..

गुरु पौर्णिमेच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा..